बुधवार, २६ एप्रिल २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी  दैनिक

वर्ष - ०२  अंक -२३१

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 26 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-231 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5


# ऑस्ट्रेलियात पाक नागरिकांचा 'मोदी है तो मुमकिन है'चा नारा

## मोदींची भारतासह जगभरातील अनेक देशांमध्ये वाढती लोकप्रियता


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जगातल्या सर्वात लोकप्रिय नेत्यांपैकी एक आहेत. मोदींची भारतासह जगभरातील अनेक देशांमध्ये लोकप्रियता वाढत आहे. आता पाकिस्तानी नागरिकांमध्येही मोदी लोकप्रिय होऊ लागल्याचे पाहायला मिळत आहे. पाकिस्तानमधील मुस्लिमांचे अनेक समुदाय आहेत जे मोदींची स्तुती करतात. ऑस्ट्रेलियातील मेलबर्नमध्ये एनआयडी फाऊंडेशनने नुकताच 'विश्व सद्भावना कार्यक्रम' आयोजित केला होता. या कार्यक्रमाला आलेल्या पाकिस्तानी लोकांनी 'मोदी है तो मुमकिन है...'चा नारा दिला.**

एएनआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार ऑस्ट्रेलियात भारतीय अल्पसंख्याक फाऊंडेशन (आयएमएफ), एनआयडी फाऊंडेशन (दिल्ली) आणि नामधारी शीख सोसायटीने विश्व सद्भावना कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला जगभरातील धार्मिक नेते, विचारवंत, अभ्यासक, धर्म प्रचारक आणि संशोधक सहभागी झाले होते. तसेच विविध धार्मिक समुदायातील पाकिस्तानी लोकही या कार्यक्रमाला आले होते. त्यातील बहुतांश लोक अहमदिया मुस्लिम समाजाचे होते.

या कार्यक्रमात अहमदिया समुदायातील मुस्लीम लोकांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले. ते म्हणाले की, मोदी सर्व समुदायांचा सन्मान करतात, ही गोष्ट आम्हाला आवडली आहे. सर्वांना एकत्र घेऊन पुढे जाण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे. म्हणूनच आम्ही त्यांचं कौतुक करतो.

मूळचे लाहोरचे असलेले अहमदिया मुस्लीम समुदायातील एक सदस्य डॉ. तारिक बट यावेळी म्हणाले की, माझे अनेक भारतीय मित्र आहेत. मी त्यांना एकत्र येऊन वेगवेगळे उपक्रम राबवताना पाहतो. मी स्वतःही अनेकदा त्यांच्या कार्यक्रमांना गेलो आहे. मला असे वाटते की भारतीय मुस्लीम आणि पाकिस्तानी मुस्लिमांमधील एकोपा वाढत आहे. आम्हाला त्यांच्यातील आणि आमच्यातील फरकापेक्षा अधिक समानता आणायची आहे. तारिक बट म्हणाले की, हिंदू असो वा मुस्लीम सर्व समुदायांमध्ये एकोपा आणि शांतता वाढवण्यासाठी, समुदायांना एकत्र आण्यासाठी प्रोत्साहन देण्याचं काम पंतप्रधान मोदी उत्कृष्टपणे करत आहेत. पंतप्रधान मोदींकडे असा करिष्मा आहे ज्यामुळे लोक त्यांच्या धार्मिक विचारांची, त्यांच्या धार्मिकतेची पर्वा न करता मोदींचे अनुसरण करत आहेत. हे खूप चांगले आहे. मोदींचे कौतुक करण्यासाठी मी म्हणेन, मोदी है ते मुमकिन हैं.





# मराठवाड्यात गारपीट

## नांदेड जिल्ह्यात गारपीट, पिकांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** मंगळवारी दुपारी मराठवाड्यातील बहुतांश भागात वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. यात आंब्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अंबड तालुक्यातील वडीगोद्री, सुखापुरी, गोंदी महसूल मंडळात दुपारी अचानकपणे झालेल्या वादळी वाऱ्यासह गारपीट झाल्यामुळे रब्बी हंगाम धोक्यात सापडला आहे. रब्बी हंगामातील गहु,हरभरा तसेच मोसंबी, आंबा आदी फळबागांची तसेच टरबूज खरबूज या पिकांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहेत. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह गारपिटीमुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. अंबड तालुक्यातील वडीगोद्री, सुखापुरी तसेच गोंदी महसूल मंडळात मंगळवारी दुपारी 3 वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यांसह पाऊस तसेच गारपीट झाली. या दरम्यान विजांचाही कडकडाट झाल्याने या भागात विज गुल झाली.

वादळी वाऱ्यासह अचानक आलेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांच मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परीसरातील अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत. तर काही ठिकाणी घरांवरील पत्रे उडून गोठयातील जनावरांना पण गारपीटीमुळे ईजा झाल्या आहेत. खरिप हंगामात झालेल्या अतिवृष्टी व सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीचे अनुदान अद्याप शेतकऱ्यांना मिळाले नाही. आणि आता परत गारपिटीने रब्बी पिके पुन्हा जमीनदोस्त झाल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या या बेमोसमी पावसाने शेतकऱ्यांचे हातातोंडाशी आलेले रब्बीचे पीके वाया जाणार असल्याने शेतकरी धास्तावला आहे. काबाडकष्ट करून पिकवलेला गहू, हरभरा तसेच मोसंबी, डाळिंब, पपई, खरबूज यांच्यासह फळपिके मोठ्या प्रमाणात वाया जाण्याच्या मार्गावर असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. अंबड तालुक्यातील वडीगोद्री, सुखापुरी व गोंदी महसूल मंडळात तुफान गारपीट झाली. करंजाळा, पिठोरी सिरसगाव, घुंगर्डे हदगाव, वडीगोद्री, धाकलगाव, भणंग जळगाव आदी भागात वादळी वाऱ्यासह गारपीट झाल्यामुळे रब्बी हंगामातील गहु आणि हरबरा तर मोसंबी, आंबा बांगांची फळगळ होऊन मोठे नुकसान झाले.

नांदेड जिल्ह्यातील नांदेड, अर्धापूर, मुखेड व लोहा तालुक्याला मंगळवारी दुपारी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाचा व गारपिटीचा तडाखा बसला. यामध्ये केळी, हळदीसह इतर पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मागील पंधरा दिवसांपासून अधून-मधून जिल्ह्याला गारपिटीचा सामना करावा लागला आहे. जनावरे जखमी झाले आहेत. जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी आपत्ती व्यवस्थापन संदर्भात प्रशासनाशी फोनद्वारे संपर्क साधून शेतकऱ्यांच्या व्यथा पोहोचवल्या. गारपिटीने हळद, केळी, भुईमूग, ऊस, यासह आंबा, चिकू, मोसंबी संत्री पिकाचे मोठे नुकसान झाले.

आसमानी व सुलतानी संकट शेतकऱ्यांची पाठ सोडायला तयार नाही . निसर्गाचा प्रकोप शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसला आहे .आणी आता त्यात भर पुन्हा या गारपिटीमुळे शेतकरी हवालदिल होऊन आर्थिक विवंचनेत सापडलेला आहे . त्यामुळे कृषी आणि महसूल विभागाने नुकसानग्रस्त भागात जाऊन पिकांचे सरसकट पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी .

– सुरेश काळे, जिल्हाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना,जालना .


# रतन टाटा यांचा ऑस्ट्रेलियाच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय उद्योग क्षेत्रातील दिग्गज, टाटा ग्रुपचे मानद अध्यक्ष रतन टाटा यांना ऑस्ट्रेलियातील सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. याबाबत ऑस्ट्रेलियाचे भारतातील राजदूत बॅरी ओ फॅरेल यांनी ट्वीट करत माहिती दिली आहे. त्यांनी ट्वीटमध्ये म्हटले की, रतन टाटा यांना 'ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया'ने सन्मानित करण्यात आले आहे.

ऑस्ट्रेलियाचे राजदूत बॅरी फॅरेल यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटले की, भारतासह ऑस्ट्रेलियासाठी रतन टाटा यांनी योगदान दिले असून ते एक महान उद्योजक आहेत. ऑस्ट्रेलिया-भारत संबंधांबद्दल दीर्घकालीन वचनबद्धतेची दखल घेऊन रतन टाटा यांना 'ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया'ने सन्मानित करताना अतिशय त्यांना आनंद होत आहे. भारतीय उद्योगपती रतन टाटांची ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्या द्विपक्षीय संबंध, व्यापार, गुंतवणूक आणि सामाजिक योगदानासाठी ऑस्ट्रेलियाच्या जनरल डिव्हीजनमध्ये एक मानद अधिकारी पदावरही निवड करण्यात आली आहे. टाटा पॉवर ओडिशा डिस्ट्रिब्युशन लिमिटेडचे एक्सिक्युटिव्ह राहुल रंजन यांनी आपल्या लिंक्डइनवर या पुरस्कार सोहळ्याचे काही फोटोही शेअर केले आहेत. या पोस्टमध्ये पुढे रंजन असे लिहितात की, रतन टाटा यांचे योगदान जगभर आहे. त्यांच्या नेतृत्व क्षमता आणि दूरदृष्टीमुळे अनेकांनी आपलं ध्येय साध्य केले आहे. तसेच रतन टाटा यांनी अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यांनी सामाजिक कार्यासाठी दानशूरपणा दाखवला आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# आणिक स्मृती ठेवुनी जाती...

आधुनिक केसरी

त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. चार दोन क्षणांसाठी आपल्या चेहऱ्यावरचा मास्क त्याने बाजूला केला. 'तुम्ही भेटायला आलात ना, मग आता मला बरे वाटेल' असे तो म्हणाला. आम्हीही परमेश्वराकडे त्याच्या लवकर बरे वाटण्याची कामना करीत होतो. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. तो या आजारातून उठला नाही. त्याला अखेरचा निरोप देण्यासाठी त्याच्या अंत्ययात्रेला केवढा तरी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

माझ्या घराजवळ स्वामी समर्थांचा मठ आहे. तो स्वामी समर्थांचा निस्सीम भक्त होता. कधी कधी मठात आला की मला फोन करायचा. 'सर, घरी आहात का ? मी येतो आहे. आपण भेटू. गप्पा मारू. ' मी सांगायचो, ' अहो दादा, मी घरीच आहे. फोन कसला करताय ? सरळ येत चला. ' आणि त्याला गमतीने म्हणायचो, ' आज तुमची ' दादागिरी ' चालणार नाही बरं का ! तुम्हाला माझ्याकडे चहा वगैरे काहीतरी घ्यावेच लागेल. ' आणि मग थोड्याच वेळात ती वामन मूर्ती माझ्या गेटचे फाटक उघडून आत येताना दिसायची. त्याच्याशी बोलताना मी आनंदी, समाधानी आणि समृद्ध व्हायचो. ती मूर्ती आता मला यापुढे कधी दिसणार नाही. सुधीर फडकेंच्या गाण्यातील शब्दांची आठवण येते. ' अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती. '





## आनंदी पहाट

## आर्थिक व्यवहार करताना सावधानता आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

नव्याने होणाऱ्या परिचयांतून अनेकदा नवनव्या संकल्पना उदयास येऊ लागतात. त्यांतून नवे ग्रुप तयार होतात. त्या ग्रुपच्या माध्यमातून व्यावसायिक चर्चा घडायला सुरुवात होते. प्रत्येकाचा एक सामायिक हेतू असतो, व्यवसायाच्या माध्यमातून अर्थार्जन करणे. त्यांतील एक-दोघे जास्तच हुशार, तयारीचे, पट्टीचे असतात. त्याच्यापुढे आपली तिजोरी उघडी करणाऱ्यांच्या उणिवा त्या हुशारांना कळलेल्या असतात. त्याचाच फायदा घेऊन, खोटा वायदा करून, कायद्याला न जुमानता, भागीदारी तत्वावर आर्थिक व्यवहार सुरु होतात. त्यांच्या दृष्टीकोनातून भागीदारी ह्या शब्दाचा अर्थ नेमका काय आहे, हे इतरांना कालांतराने समजते. त्यांचा भागीदारीचा अर्थ निराळा असतो, त्यांनीच फक्त भागी घ्यायची आणि इतरांना दार दाखवायचे. ह्यामुळे जो मुळांत धनाढ्य आहे तो कंगाल होतो, जो कंगाल आहे तो धनाढ्य होऊन जातो. निरनिराळ्या व्यावसायिक आस्थापना आपल्या स्वतःच्या व्यावसायिक उन्नतीसाठी, वाढीसाठी, वृद्धीसाठी आर्थिक गुंतवणूक करण्याच्या, गुतंवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी जाहिराती करत असतात. अशा जाहिरातींमध्ये कितपत तथ्य असते, नमूद केलेल्या बाबींमध्ये किती सत्य असते, ह्यादृष्टीकोनातून गुंतवणूक करण्याअगोदर अभ्यासपूर्वक विचार, वर्तन आणि व्यवहार करावा. समाज माध्यमातून केल्या जात असलेल्या व्हिडिओ जाहिरातींची तर लगेच भुरळ पडते. अनेक व्यावसायिक, बिल्डर्स, मोठ्या कंपन्या आपल्या व्यवसायांत अगदी नगण्य रक्कम घेऊन शेअर्स, फिक्स्ड डीपॉझिट निरनिराळ्या ठेवींच्या स्कीम्स जाहिरातींच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना आकर्षित करत असतात. मोठ्ठा परतावा मिळण्याची आमिषे दाखवून कोट्यावधींचा पैसा गोळा करतात आणि मूळ उद्देश बाजूला ठेऊन हाती लागलेला पैसा एकतर वारेमाप उधळतात अथवा त्या पैशाचा गैरवापर, अवैधरीत्या, निरनिराळ्या स्वतःच्या प्रकल्पांमध्ये करायला लागतात. अनेकांच्या अशा व्यवहाराची परिणती कालांतराने फसवणूक, आर्थिक गुन्हेगारी झाल्याचे उघड होते.



आधुनिक केसरी

**इंद्रायणी माता | पान्हा सोडी ||**
**स्नेहाळ प्रेमाचा | झरा इंद्रायणी ||**
**सांगे परावाणी | ज्ञानयोगी ||१||**
**करावे सार्थक | येऊनिया जन्मा**
**कर्मयोगी आत्मा | ओळखावा ||२||**
**अंतरीचे रूप | जणोनिया घ्यावे ||**
**मौनात पाहावे | आत्मारूप ||३||**
**एकांती रमता | सखी होते गाथा ||**
**जन्माच्याच व्यथा | दूर होती ||४||**
**तुझे माझे सारे | जळोनिया जाता ||**
**इंद्रायणी माता | पान्हा सोडी ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

**नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं स्वर्णमुकूटधारिणे । ईश्वरी सर्वभूतानांजगदोद्धारकारिणे ।।५।। हे स्वर्णमुकुटधारिणे, तू सर्व भूतांची स्वामिनी आहेस. जगताचा उद्धार करणारी आहेस. तुला वारंवार नमस्कार असो.**




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**मनुष्य सज्जन जानिए, जाके हृदय सद्गुण वशे । जीवन सदा उपकार में, वे सत्य दया जिसमें लशे ।।०३।। (स्वर्वेद षष्ठ मण्डल प्रथम अध्याय) ०६/०१/०३**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

ज्याच्या हृदयात सद्गुणांचा निवास आहे, त्या मनुष्याला सज्जन समजलं पाहिजे. त्याचे जीवन तसेच कर्म सदैव परोपकारासाठी आहे. सत्य, दया आदि गुण त्या व्यक्तीमध्ये सुशोभित असतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## देवदर्शन

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


कर्म हे नेहमी चांगलेच करावे कर्ता कधीही होऊ नये. ही तर संतमहात्म्यांची शिकवण आहे. आपला धर्मग्रंथ गीता सुध्दा हीच शिकवण देते. एखाद्या कारागीराने सुंदर मंदीर उभारले. ऊदा, वेरूळचे कैलास लेणे ते निर्माण करणारा कारागीर व ऊंच कळस हे जसे एक नाहीत. कारण सांगणारा निराळा आहे व कर्ता याठिकाणी वेगळा आहे.

जग निर्माण करणारा जगदीश जगाहून वेगळा आहे. हे सुंदर जग निर्माण करणे ही खरंतर त्याची अजब कला आहे. म्हणून तो त्रिभुवनाचा अधिपती असुनही जगापेक्षा वेगळा आहे. देवतत्व संपूर्ण दृष्य पदार्थ मिथ्या आहेत. नाशवंत आहेत त्यास पायाभूत असणारे अमृत तत्व म्हणजे देव होय. सगळंजग जरी नाश पावले तरी ते जसेच्या तसे टिकते. ते टिकवून ठेवण्याची क्रिया ज्याच्या कडून होते तो देव होय. हे विश्व निर्माण करणारा पंचमहाभूतांच्या पेक्षा आत्माराम अगदी वेगळा असतो. "म्हणोनि जग मिथ्या साच आत्मा। सर्वा पर जो परमात्मा अंतरबाह्य अंतरात्मा। व्यापून असे।"

मायेने निर्माण केलेला हा विश्वाचा पसारा दृष्य आहे. असा खोटा व चुकीचा विचार कोणत्याही अद्वैत ग्रंथात दिसणार नाही. दृष्य हे मिथ्या आहे. पण आत्मस्वरूप मात्र खरे आहे. त्याच्याही पलीकडे परमात्मा आहे. अंतरात्मा सर्वांना आतबाहेर व्यापून असतो.

# स्वत:ला सुधारा की त्या मानाने जग सुधारेलच

आधुनिक केसरी



'आपणच काय ते सर्व करणारे' अशी भावना आपण ठेवतो, आणि पुढे दुःख वाट्याला आले म्हणजे वाईट वाटून घेतो. ज्याचे फळ आपल्या हाती नसते ते कर्म 'मी केले' असे म्हणण्यात काय पुरुषार्थ आहे ? 'मी भगवंताचे कृत्य भगवंताला अर्पण करतो' असे म्हणतो, याचासुद्धा अभिमान आपल्याला होतो. जगात सात्त्विक वृत्तीने वागणारे पुष्कळ असतात, पण 'मी करतो' हा अभिमान त्यांचाही सुटत नाही. खरोखर, नुसत्या कर्माने परमार्थ साधत नाही; 'कर्ता मी नाही' हे समजले म्हणजे सर्व साधते. नसलेले कर्तेपण आपल्याकडे ओढून घेऊन माणूस सुखी किंवा दुःखी होतो. ज्याच्याकडे कर्तेपण आहे त्याला ते देऊन आपण सुखदुःखातीत राहावे.

खोलीतल्या खोलीत जो सुख मानून घेतो तो कैदी खरा सुखात असेल असे आपल्याला वाटते. देहाच्या पलीकडे काही नाही असे मानू लागलो आणि विषयातच सुख पाहू लागलो, तर ते त्या कैद्याप्रमाणेच नाही का ? पण त्याच्यापलीकडे काही आहे हे त्याला समजले नाही तोपर्यंतच हे सुख वाटेल. एकदा का बाहेरची हवा कैद्याला लागली म्हणजे तो नाही म्हणणार कैदीपणाच चांगला म्हणून. त्याचप्रमाणे एकदा भगवंताच्या आनंदाची हवा लागली म्हणजे माणूस नाही विषयात राहणार. चित्त आपल्याला निर्विषय करता येणार नाही, पण ते भगवंताकडे लावता येणार नाही असे नाही. बुजार घोड्याला जसे चुचकारून घेतात, तसे मनाला करावे. वृत्ती जिथे पालटायला लागते तिथे सावध राहावे. भगवंताचे स्मरण चुकले की काही तरी अवघड वाटायला हवे. आज नको वाटणारे नामस्मरण बळजबरीने करावे, म्हणजे हवेसे वाटणारे विषय जातात. प्रापंचिक अडचणींतून जर आपण मार्ग काढतो तर मग परमार्थातल्या अडचणींना का भ्यावे ? जर आज आपल्याला विवेकाने सुखी राहता आले नाही तर आपल्याला सुख कधीच मिळणार नाही. नुसते गिरिकंदरात जाऊन कुठे परमार्थ साधत असतो का ? तसे असते तर तो माकडांनाही साधला असता ! खालच्या प्राण्यांना आपले विकार आवरण्याचा विचार नसतो. पण मनुष्याला चांगले-वाईट कळते, त्याला सारासार विचार करण्याची शक्ती आहे, ही त्याच्यावर भगवंताची कृपाच आहे. जग सुधारण्याच्या नादी आपण लागू नये; त्या कामासाठी लोक जन्माला यावे लागतात. अगदी आपला मुलगा जरी झाला तरी त्याला योग्य ते सांगून पाहावे, पण 'मी त्याला सुधारीनच' हा भ्रम नसावा. स्वतःला सुधारा की त्या मानाने जग सुधारेलच. **आजचे बोधवचन आहे –** कर्तव्य म्हणून वकील जसा भांडतो, त्याप्रमाणे कर्तव्य म्हणून प्रामाणिकपणे आपण प्रपंच करावा. त्यामध्ये भगवंताला विसरू नये.

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**अव्यक्त तें आकारलें । रूपा आलें गुणवंत ॥२॥**
**तुका म्हणे पुरवी इच्छा । जया तैसा विठ्ठल ॥३॥**
**देखोनि पुराणिकांची दाढी । रडे स्फुंदे नाक ओढी ॥१॥**
**प्रेम खरें दिसे जना । भिन्न अंतरीं भावना ॥ध्रु.॥**
**आवरितां नावरे । खुर आठवी नेवरे ॥२॥**
**बोलों नयें मुखावाटां । म्हणे होतां ब्यांचा तोटा ॥३॥**
**दोन्ही सिंगें चारी पाय । खुणा दावी म्हणे होय ॥४॥**
**मना आणितां बोकड । मेला त्याची चरफड ॥५॥**
**होता भाव पोटीं । मुखा आलासे शेवटीं ॥६॥**
**तुका म्हणे कुडें । कळों येतें तें रोकडें ॥७॥**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, २६ एप्रिल २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# ऐतिहासिक मोमबता: प्रशासनाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**दौलताबाद :** येथील ऐतिहासिक देवगिरी किल्ल्याला पाणी पुरवठा करणाऱ्या ऐतिहासिक मोमबता तलावाची पूरातन भिंत कोसळी असून कोणत्याही क्षणी तलाव फुटण्याचा धोका मोठ्या प्रमाणात संभवतो आहे.

प्रशासनाच्या अधिकारी कर्मचारी यांनी या गँभिर घटने कडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत असून अद्याप या ठिकाणी कुणीही कर्मचारी अधिकारी यांनी भेट दिलेली नाही. मोमबत्ता तलावाच्या भिंती वर मोठं मोठे वृक्ष वाढल्याने त्यातील एक वृक्ष शुक्रवारी सुटलेल्या वादळी वाऱ्याने उन्मळून पडल्याने तलावाच्या मधल्या भागात असलेली भिंत ही कोसळी आहे. भिंत कोसळल्याने तलाव फुटण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला असून अवकाळी पाऊस झाल्यास कोणत्याही क्षणी सम्पूर्ण भिंत कोसळून तलावाचे पाणी तलावाखालील गावात व रिसॉर्ट हॉटेल,फार्म हाऊस मध्ये शिरण्याच्या धोका संभवतो आहे.या मुळे मोठ्या प्रमाणात जीवित हानी होण्याची भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

ऐतिहासिकदेवगिरी किल्ल्याला पाणी पुरवठा करण्यासाठी दोनतलावाची निर्मिती बाराव्या शतकात करण्यात आली होती अशी शक्यता अभ्यासक वर्तवतात. ऐतिहासिक मोमबत्ता तलाव हा दोन डोंगराच्या मध्ये बांधलेला असून जवळपास १७५ मीटर लांब १० मीटर रुंद व ५० फूट खोल अशी उंच ही तलावाची भिंत असून सध्यस्थीतील यावर अनेक लहान मोठे वृक्ष उगवलेले आहे.

पूर्वी जिल्हा प्रशासन सदर उगवलेले वृक्ष कापून टाकत असे परंतु मागील काही वर्षांपासून सदर वृक्षांची छाटणी करण्यात आलेली नाहीत सदर भिंत ही दगडी चीऱ्यानी बांधली असल्याने वृक्षांच्या मुळा या भिंती मध्ये जाऊन भिंत जागोजागी ढासळत आहेत व त्यातच वादळी वाऱ्याने मोठे वृक्ष कोसळल्याने मोठे भगदाड पडले आहे व सध्या असलेल्या पाणी पातळीच्या एक ते दोन फूट जवळ असल्याने मोठी जीवित हानी होऊ शकते.



एक मोमबत्ता तलाव तर दुसरा रंगमहाल तलाव हे आहेत . कालांतराने या तलावाचा वापर नजीकच्या गावांना पाणी पिण्यासाठी होऊ लागला व आजही मोठ्या प्रमाणात यातलावांचा फायदा होत आहे यातलाव व परिसरात मोठ्या प्रमाणात व्यावसायिकांनी अतिक्रमण केलेले आहेत त्यामुळे एखादी अनुचित घटना घडल्यास तिथं पर्यत मदत पोहचवणे अवघड होईल,या अतिक्रम धारकांनी याऐतिहासिकतलावाचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे . प्रशासनाने या कडे लक्ष देऊन हे अतिक्रमण हटवावे वतलावा भोवती असलेले धोकादायक वृक्ष काढून टाकावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे . अकरा वर्षांपूर्वी दौलताबाद ग्रामपंचायतीने पाटबंधारे विभाग व तहसील कार्यालयाला पत्र लिहून मोमबत्ता तलावाच्या भिंती वरील वृक्ष कापून सदर भिंत सुरक्षित केली होती अशी माहिती माजी सरपंच सैय्यद हरून यांनी दिली .

> मोमबत्ता तलाव हा केंद्रीय किंवा राज्य पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत येत नाही . मात्र या तलावापासून देवगिरी किल्ल्यात नहरीने पाणी आणल्याचे अवशेष आजही आढळतात . तलावाच्या अवतीभवती अनेक असंरक्षित ऐतिहासिक वास्तू भग्नावस्थेत उभ्या आहेत . या तलावाच्या भिंतीचे आणि या वास्तूंचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन व्हावे, यासाठी स्थानिक ग्रामस्थ आणि राजकीय पुढाऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे आग्रह धरला पाहिजे .
>
> **– संकेत कुलकर्णी सदस्य, गड संवर्धन समिती, महाराष्ट्र राज्य**

# दुधना नदीपात्रातून वाळू उपसा जोमात

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश कवडे**

**परतूर :** तालुक्यातील मौजे घेटुळी, बाबुलतारा येथील दुधना नदीपात्रातून अवैधरित्या राजरोसपणे वाळु उपसा सुरु आहे. सविस्तर वृत्त असे की, गेल्या दोन महिन्यांपासून घेटुळी व बाबुलतारा येथील दुधना नदी पात्रातील पाणी कमी झाले आहे त्यामुळे तिथे स्वच्छ आणी चांगली दाणेदार रेती पावसाच्या पाण्यामुळे येऊन साचलेली आहे. येथील वाळूला तालुक्यात चांगला भाव मिळत असल्याने भुरट्या वाळु माफियांनी आपला मोर्चा घेटुळी तसेच बाबुलतारा वाळुपट्यात वळवला आसुन रात्री बारावाजेच्या नंतर ते सकाळी पाचवाजेपर्यंत सर्रास अंदाजे चाळीस ट्रॅक्टरर्स व दहा हायवाद्वारे बेसुमार वाळूचा उपसा होत आहे. यामुळे परिसरातील पर्यावरणाचे समतोल बिघडत असून तेथील भुभागातील पाणी पातळीतही घत होत आहे. तसेच बाबुलतारा येथील उपसरपंच व गावकरी यांनी येथील वाळूउपसा थांबवा अन्यथा मोठे जण आंदोलन उभारू शकतो अश्या प्रकारचे निवेदण परतूर तहसिलदार चित्रक यांनाही दिले आहे. मात्र अजुनही कार्यवाही शुन्यच असल्याने बाबुलतारा ग्रामस्थातून रोष व्यक्त होत आहे. तरी महसुल व पोलिस प्रशासनाने या वाळू माफियांवर तात्काळ कारवाई करावी व घेटूळी तसेच बाबुलतारा येथून अवैधरीत्या होणाऱ्या वाळूचा उपसा थांबवावा, अशी मागणी बाबुलतारा, घेटुळी येथील ग्रामस्थांकडुन होत आहे.



# पालकमंत्र्याच्या तालुक्यात भरपाईसाठी शेतकरी बसले आमरण उपोषणाला




आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** तालुक्यात संततधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान झालेले आहे . यामुळे हजारो हेक्टरवरील शेती पिकाला फटका बसला आहे . यामुळे पैठण तालुक्यात सप्टेंबर - आक्टोबर 2022 दरम्यान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात झालेल्या काही ठिकाणी अतिवृष्टी व पैठण तालुक्यातील संततधार पावसामुळे कापूस, तूर, सोयाबीन, मका, कांदा, भाजीपाला व फळबागांचे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. याबाबत छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री यांनी याबाबत स्वतः आश्वासन देवून शेतकऱ्यांना संततधार पावसामुळे नुकसानीची भरपाई तात्काळ देण्याचे कबुल केले परंतु त्यास सहा ते सात महिन्याचा कालावधी उलटून देखील नुकसान भरपाई देण्यात आली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता आक्रमक भूमिका घेतली असुन मंगळवारी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने पैठणला अमरण उपोषण करण्यात येत आहे.

उपोषण ठिकाणी राष्ट्रवादीचे भाजपा, मराठा सेवा संघ, छावा संघटनेच्या पदाधिकारी यांनी भेटी देऊन आपला पाठिंबा दर्शवला असून शेतकर्यांनी अतिवृष्टी अनुदान मिळावे म्हणून उपोषणाचे हत्यार उपसले यास उत्तर म्हणून तहसील कार्यालयातुन पत्र देण्यात आले, की सध्या अनुदानचा अहवाल अप्राप्त असुन शासन निर्णय प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल त्यामुळे आपले उपोषण मागे घेवुन शासनास सहकार्य करावे असे पत्र दिले.

परंतु उपोषण कर्ते ठाम असून शेतकऱ्यांचे अमरण उपोषण सुरूच राहील अशी माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हा अध्यक्ष ज्ञानदेव मुळे यानी दिली. यावेळी संतोष तांबे तालुकाध्यक्ष, गणेश भुजबळ, सुखदेव लबडे, भाऊसाहेब नरके, कृष्णा नरके आबासाहेब नरके उध्दव मापारी शब्बीर शेख महेश लांडगे,सलिम पठाण अशोक मगरे गणेश शेळके संदिप पडुळ दिलप नरके, विठ्ठल लांडगे, अनिरुध्द चौधरी, योगेश ओटे, अंकुश औटे, कल्याण वाघ, नारायण गोरे, परमेश्वर कोल्हे यांची उपस्थिती होती.

# मुख्यमंत्री म्हणून झळकले फडणवीसांचे फलक

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** जिल्ह्यात बुटीबोरी येथे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच राज्याचे भावी मुख्यमंत्री, असे फलक लावण्यात आल्यामुळे आता शहर व जिल्ह्यामध्ये राजकीय वतुर्ळात या फलकाची चांगलीच चर्चा रंगू लागली आहे.

राष्ट्रवादीचे नेते व विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी एका मुलाखतीदरम्यान मुख्यमंत्री होण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर सध्याच्या राजकीय घडामोडी बघता राज्याच्या मुख्यमंत्रीवरून चांगली चर्चा सुरू असताना नागपुरात बुटीबोरी भागात भारतीय जनता पक्षाचे माजी नगराध्यक्ष व फडणवीस यांचे समर्थक असलेले बबलू गौतम यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा भावी मुख्यमंत्री म्हणून बुटीबोरी चौकात मोठे फलक लावले आहे. या फलकामुळे ग्रामीण व शहरात या फलकाची चांगलीच चर्चा रंगू लागली आहे.या फलकावर प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह बबलू गौतम यांचे छायाचित्र आहे. याबाबत बबलू गौतम यांच्याशी संवाद साधला असता देवेंद्र फडणवीस आमचे नेते आहे. ते राज्याचे मुख्यमंत्री होते. एकनाथ शिंदे राज्याचे मुख्यमंत्री आहे. मात्र, भावी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस राहणार आहे. त्यामुळे आम्ही बुटीबोरी चौकात असे फलक लावले असल्याचे ते म्हणाले.



# टीम इंडिया

आधुनिक केसरी

आयपीएल २०२३ दरम्यान बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपसाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. डब्ल्यूटीसीच्या अंतिम सामन्याला इंग्लंडमध्ये ७ जूनपासून होणार आहे. यामध्ये भारत आणि ऑस्ट्रेलियाचे संघ आधीच पात्र ठरले आहेत. ऑस्ट्रेलियन संघ आधीच जाहीर झाला होता, आता बीसीसीआयने भारतीय संघ जाहीर केला आहे. संघाची कमान पुन्हा एकदा रोहित शर्माच्या हाती असेल, तर अशा अनेक खेळाडूंचाही संघात समावेश करण्यात आला आहे, जे भारतीय कसोटी संघातून बराच काळ बाहेर होते. आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्सकडून खेळणाऱ्या आणि उत्कृष्ट खेळ दाखवणाऱ्या अजिंक्य रहाणेला बीसीसीआयने बक्षीस दिले आहे. त्याला पुन्हा एकदा टीम इंडियाचे तिकीट मिळाले आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने ७ जून ते ११ जून दरम्यान ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलसाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. टीम इंडियाची कमान रोहित शर्माच्या हाती असेल. महत्त्वाच्या सामन्यासाठी अजिंक्य रहाणेचे संघात पुनरागमन झाले आहे. दुखापतग्रस्त ऋषभ पंत, श्रेयस अय्यर आणि जसप्रीत बुमराह यांना टीम इंडियात स्थान मिळालेले नाही. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलसाठी तब्बल वर्षभरानंतर अजिंक्य रहाणेचे कसोटी संघात पुनरागमन झाले आहे. श्रेयस अय्यरच्या दुखापतीमुळे मधल्या फळीत जागा रिकामी होती. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटीत टीम इंडियाने सूर्यकुमार यादवला स्थान दिलं होतं. पण तो डाव यशस्वी झाला नाही. त्यामुळे पुन्हा एकदा निवड समितीने वरिष्ठ खेळाडू अजिंक्य रहाणेवरच विश्वास व्यक्त केला आहे. यासोबतच रहाणेला आयपीएलमधील चमकदार कामगिरीचे बक्षीसही मिळाले आहे. अशातच महत्त्वाची बाब म्हणजे ऑस्ट्रेलियाविरुद्ध खराब कामगिरी करूनही सर्वांच्या टीकेचा धनी झालेला केएल राहुलला टीम इंडियातील जागा वाचवण्यात यश आले. निवड समितीने विकेटकीपिंगसाठी केएस भरतवरच विश्वास व्यक्त केला आहे. मात्र, मधली फळी आणखी मजबूत करण्यासाठी कर्णधार रोहित शर्मा केएल राहुलकडे यष्टीरक्षणाची जबाबदारी देणार का हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, अजिंक्य रहाणे, केएल राहुल, केएस भरत (यष्टीरक्षक), आर अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, शार्दुल ठाकूर, उमेश यादव , जयदेव उनाडकट.

# लोकसंख्येचा विस्फोट

आधुनिक केसरी

**पृथ्वीची निर्मिती अब्जावधी वर्षांपूर्वी झाली व सजीव सृष्टी अस्तित्वात आली होमोसेपिअन्स या मानव प्रजातीची उत्क्रांती होत गेली रानटी अवस्थेमध्ये तो शिकार करणे, झाडांची फळे, कंदमुळे खाणे यावर गुजराण करत होता नंतर तो आग पेटवायला शिकला टोळ्यांनी राहायला लागला, चाकाचा शोध लागला शेती करू लागला, रानटी अवस्थेत असताना तो निसर्गाचा अविभाज्य घटक होता परंतु निसर्गातील अतिवृष्टी, वीज पडणे, महापुर यने, भूकंप होणे अशा कितीतरी सहारक व प्रलयकारी उग्र घडामोडीला त्याने तोंड दिले.**

अनेक संकटांना तोंड देण्यासाठी तो टोळ्या टोळ्यांनी राहू लागला व त्याने एक स्वतःची वेगळी वसाहत निर्माण केली. स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर व त्याच्यामध्ये झालेल्या उत्क्रांतीमुळे तो इतर प्राण्यांच्या वस्तीपासून वेगळा राहू लागला. काळाच्याओघात. डार्विनने म्हटल्याप्रमाणे तो पृथ्वीवर आपल्या अस्तित्वासाठी सतत संघर्ष करत राहिला. नैसर्गिक घटना बघून त्यामध्ये होणारे बदल बघून त्याच्या मनामध्ये कुतूहल निर्माण झाले. हे बदल प्रलयकारी उग्र स्वरूपाचे किंवा सुखद असो ते त्याने आपल्या चिकित्सक बुद्धीने व जिज्ञासू वृत्तीने जाणून घेतले त्यानुसार त्याला सामोरे जाण्यासाठी स्वतःमध्ये मानवाने खूप मोठे बदल केले व आपले जीवनमान अधिकाधिक कसे सुंदर होईल याकडे लक्ष दिले. त्याच्यामध्ये असलेल्या सुप्त गुणाचा त्याने विकास केला निसर्गामधील बदलते स्वरूपाचे रहस्य जाणून घेण्यासाठी त्याने अनेक शोध लावले. सर्जनशीलतेच्या जोरावर त्याने नवनिर्मिती केली. जगण्याला अधिक अर्थपूर्ण केले हडप्पा मोहनदडो ग्रीक इत्यादी अनेक संस्कृती निर्माण झाल्या तर काही काळांच्या ओघात नष्ट झाल्या. उत्क्रांती होत असताना त्याने अनेक कौशल्य व प्राविण्य संपादित केले व आयुष्य अधिकाधिक समृद्ध व सुंदर बनवले. अनेक टूल्स व टेक्निक विकसित केले. अनेक घडणाऱ्या घटनांची तर्कशुद्ध मांडणी करून शास्त्रीय विश्लेषण केले. संस्कृतीचा विकास होत असताना अनेक धर्म, पंथ, राष्ट्र, जाती निर्माण झाल्या व त्यामध्ये संघर्ष सुद्धा झाले व आजही होत आहे. जेम्स वॅट ने वाफेवर चालणाऱ्या इंजिनाचा शोध लावला व औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अति सहारक अनुबॉम् व जैविक अश्र निर्माण केली गेली. आज तो मोबाईल व डिजिटल तंत्रज्ञान आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या दुनियेत जगत आहे. त्याचबरोबर मनुष्यामध्ये एकाकीपणा, असुरक्षितता, बेरोजगारी वाढली. महागाई व भ्रष्टाचारामुळे तो हवालदिल झाला त्याच्या आशा आकांक्षा अनेक मार्गाने बंदिस्त करण्याचे प्रयत्न झाले. असे असले तरीही त्याने प्रगतीचा एक मोठा टप्पा गाठला व हा टप्पा अतिशय आश्चर्यकारक व डोळ्यात भरणार आहे परंतु भारत देशामध्ये तो स्वतःच्याच संख्येला आळा घालू शकलेला नाही व आज ही लोकसंख्या वाढ त्याच्या प्रगतीच्या आड येत आहे. मानवी जीवनाचा सर्वांगांनी विचार केला तर तो ज्या संस्कृतीत, संस्कारात वाढतो ज्या रूढी परंपरा मानवाने स्वीकारल्या त्याचे पडसाद त्याच्या जडणघडणीत प्रतिबिंबित झालेले आपल्याला दिसतात. त्याचाच परिणाम म्हणजे भारत देशामध्ये लोकसंख्येचा विस्फोट झालेला आहे व त्याला जबाबदार माणूसच आहे. रुसो म्हणतो व्यक्ती जरी स्वतंत्र जन्मला तरी मोठा होत असताना प्रत्येक ठिकाणी तो ज्या संस्कार व परंपरांत वाढला त्याच्या शृंखलात तो अडकला जातो. Man is born free but every where is in chains. त्याचा त्याप्रमाने माईंड सेट तयार झालेला असतो व ती त्याची मानसिक अवस्था बदलणे कठीण होते. त्यामुळे लोकसंख्येला आळा घालने त्याला खूप कठीण झाले आहे. आज भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश झाला आहे 2011 नुसार आपली लोकसंख्या 125 कोटी म्हणजे जगाच्या 17.5% होती व नंबर एकला चीन देश होता. 2030 सली आपण चीनला क्रॉस करू असे समाज शास्त्रज्ञांनी भाकीत केले होते परंतु आजच आपण खूप मोठा पल्ला गाठला व 2023 लाच आपण चीनच्या पुढे गेलो आहे. आपल्या देशात दर मिनिटाला 51 मुले जनंमतात तर चीनमध्ये फक्त 28 मुले दर मिनिटाला जनमतात. एकाच वर्षी जर दोन अडीच कोटी बाळांना जन्म दिला तर भारतामध्ये लोकसंख्येचा विस्फोट होणारच. आज भारताची लोकसंख्या 142 कोटी 86 लाख झाली आहे. ही आकडेवारी बघितली तर भारताचे लोकसंख्या उफाळून आल्यासारखे वाटते व ती बघून आपण हादरून जातो. लोकसंख्या वाढीमुळे नवीन येणाऱ्या पिढीला सर्वांना रोजगार कसा देणार, भविष्यात डिजिटल व माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये रोजगार संधी कमी होणार आहे. ठराविक कौशल्य प्राप्त केलेल्या लोकांनाच रोजगार मिळेल उरलेल्या तरुणांना राजकारणी जयजयकार करण्यासाठी वापरणार व त्यातूनच टोळीयुद्ध, माफिया गुंडगिरी, वसुली, खंडणी असले प्रकार उदयास येणार. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न सुद्धा निर्माण होणार नुकतीच झालेले अतिफ अहमद व आश्रफ यांची हत्या किंवा मोब लिंचींग, बलात्कार दरोडे असे अनेक गुन्हे आपल्याला दिवसाढवळे बघायला मिळत आहे. सत्ताधारी वर्गांना निरंतर सत्तेमध्ये राहायचे असल्यामुळे त्यांना सुज्ञ नागरिक नको आहे ते जर शिकून जागृत झाले तर आपले हक्क व अधिकारांसाठी आंदोलन करतील व प्रस्थापित व्यवस्थेला हादरे देतील म्हणून बहुसंख्य समाजाची होठ बँक साठी उपयोग केला जातो. आज अनेक शेतकरी आत्महत्या करत आहे कारण घरात लोकसंख्या वाढल्यामुळे असलेल्या शेतीचे तुकडे होतात व अल्पभूधारक झाल्यामुळे शेतीचे उत्पन्न गुजरान करण्यासाठी अपुरे पडते त्यामुळे उपासमार कर्जबाजारी वेसने होऊन अनेक जण स्वतःला संपवण्याच्या मार्ग निवडतात. लोकसंख्येच्या बेसुमार वाढीमुळे अशा अनेक नवनवीन समस्या उदभवत आहे. निसर्गाची जी अन्नसाखळी आहे ती सुद्धा माणसाच्या हस्तक्षेपामुळे विस्कळीत होत आहे प्राणी व वनस्पतीच्या काही जाती नष्ट झाल्या आहेत तर काही दुर्मिळ झाल्या आहेत विज्ञान व तंत्रज्ञानात तंत्रज्ञानाच्या जोरावर आपण करोणा सारख्या वायरस वर लस काढली व त्याला निष्क्रिय केले अनेक रोग देवी, प्लेग, कॉलर, कॅन्सर सारखे वैद्यक शास्त्रातील प्रगतीमुळे बरे होऊ लागले व त्यामुळे मनुष्य मृत्यू दर कमी झाला परंतु जन्मदर च्या प्रमाणात कमी व्हायला पाहिजे होता त्या प्रमाणात झाला नाही. भारतीय लोकांमध्ये लोकसंख्या वाढीविषयी जनजागृती नाही ते रूढी परंपरा अंधश्रद्धा धर्मांधता जातीयता यामध्ये अडकल्यामुळे लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम त्यांना कळत नाही अगोदरच बेरोजगारी भ्रष्टाचार प्रदूषण गुन्हेगारी याने देश पोखरला आहे लोकसंख्या वाढीचे कारणे व त्याला आळा घ**** हे जनसामान्याच्या लक्षात आणून दिल्या जात नाही तर हिंदू मुस्लिमांच्या नावाखाली लोकसंख्या वाढीला प्रोत्साहन देण्याचे काम होत आहे. धार्मिक चाली रितीमुळे व रुढीमुळे कुटुंब नियोजनास अनेक लोक तयार होत नाही तसेच गरीब गरिबी अज्ञान बेकारी मुळे सुद्धा लोक कुटुंब नियोजनाकडे दुर्लक्ष करतात मुलांना जन्मास घ**** ही देवाची कृपा आहे वंशाला दिवा असावा मुला मुलींचे लग्न अल्पवयातच करणे बहुपत्नी प्रथा, प्रजनन उपचार करून गर्भधारणा करणे इत्यादी अनेक कारणे लोकसंख्या वाढीसाठी कारणीभूत ठरतात लैंगिक शिक्षणाचा अभाव गर्भनिरोधकाबद्दल अनभिज्ञ असणे व माहिती न करून घेणे त्याविषयी त्यांना संकोच वाटणे पालक व शिक्षकांनी याविषयी जागरूकता निर्माण न करणे असे अनेक कारणे लोकसंख्या वाढीस कारणीभूत ठरतात. भारत हा देश उष्ण कटिबंधामध्ये असल्यामुळे आपले भौगोलिक परिस्थिती प्रजननास पोषक आहे व लहान वयातच लग्न होत असल्यामुळे लोकसंख्या वाढी मध्ये भर पडते. देशात कृषी उत्पादन व औद्योगीकरण जरी वाढले तरी वाढत्या लोकसंख्या मुळे पाहिजे ते आर्थिक उद्दिष्ट आपण साध्य करू शकत नाही लोकसंख्या वाढीमुळे अन्न वस्त्र निवारा आरोग्य शिक्षण या पायाभूत मूलभूत सुविधा पासून अनेक लोक वंचित राहत आहे त्यामुळे देशाच्या प्रगतीला खेळ बसतो. लोकसंख्या वाढीमुळे देशा जय संसाधन आहे ते अपुरे पडत आहे पृथ्वीवरील साधन व संसाधन संपुष्टात येत आहे पर्यावरण संतुलन मोठ्या प्रमाणात बिघडले आहे बेसुमार वृक्षतोड अर्बनायझेशन सिमेंट काँक्रीटचे जंगल शेतीसाठी व समृद्धी महामार्गासाठी जंगलतोड यामुळे तापमानात वाढ होत आहे प्रदूषण वाढत आहे. वन्यजीव संपत्तीचा रास व इतर अनेक समस्या आपल्याला भेडसावत आहे निसर्गातील खनिज संपत्ती कोळसा तेल नैसर्गिक वायू झपाट्याने कमी होत आहे त्यामुळे नैसर्गिक संतुलन बिघडत आहे कारण नैसर्गिक संपत्तीचा आपण अंधाधुंदपणे वापर करत आहोत व पर्यावरणाच्या रासाला आपण स्वतः जबाबदार आहोत. आदिवासी भागात कुपोषण उपासमार होऊन अनेक बालक दगावत आहे पाण्याची कमतरता पडत आहे लोकसंख्या वाढीमुळे गर्दी ट्रॅफिक जाम झोपडपट्टी गुन्हेगारी ताण तणाव गुन्हेगारी दहशतवाद प्रादेशिक वाद इत्यादी समस्या राष्ट्राच्या प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करत आहे. शेतीसाठी कीटकनाशकांचा खतांचा मोठ्या प्रमाणावर वापर केल्यामुळे जमिनीचा कस कमी होऊन उत्पादन घटत आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कुटुंब नियोजन आणि लोकसंख्या वाढीच्या प्रश्नावर प्रभावी पर्याय सांगितलेले आहेत त्यासाठी त्यांनी पुरुष नसबंदी तसेच वैज्ञानिक संशोधनावर भर देऊन गरभ निरोधक पर्याय सांगितला तसेच जास्त मुलांना जन्माला घ**** हा सामाजिक अपराध आहे असे सांगितले. गांधींनी याला विरोध केला होता कारण स्व संयम पाळून लोकसंख्या कंट्रोल केल्या जाईल असे गांधीचे मत होते. पुढे बाबासाहेब म्हणतात लोकसंख्या आटोक्यात आणली तरच आर्थिक नियोजन व प्रगती चांगल्या प्रकारे होऊ शकते. गरीबाना सूचित करतात की समाजाला आर्थिक प्रगती करायची असेल तर कुटुंब नियोजन हा प्रभावी पर्याय त्यांनी सुचवला होता. दहा नोव्हेंबर 1938 स*** मुंबई पालिका सभागृहात श्री रोहनच्या वतीने त्यांनी कुटुंब नियोजन साठी बिल मांडले होते. लोकसंख्या वाढीमुळे फ्रिज व इतर इलेक्ट्रॉनिक डिवाइसचा वापर आपण जास्त प्रमाणात करतो व क्लोरोफ्लोरोकार्बन या वायूचे जास्त प्रमाणात विसर्जन होते त्यामुळे ओझोनचा थर पातळ होतो व अल्ट्राव्हायोलेट सारख्या हानिकारक किरणांना आपण पृथ्वीवर येऊ देतो त्यामुळे अनेक रोग होण्याचा संभव असतो. अन्न पाणी ऊर्जा व घराची मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे व या पायाभूत सुविधामुळे संसाधनाचा ऱ्हास होत आहे. लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी लहान कुटुंबांना प्रोत्साहन दिले पाहिजे मानव केंद्रित व नीती केंद्रित संस्कृती निर्माण करायला पाहिजे आरोग्यसेवा शिक्षण रोजगारांच्या संधी उपलब्ध करून द्यायला पाहिजे प्रत्येक शाळेत पाठ्यक्रमामध्ये लैंगिक शिक्षण अनिवार्य करायला पाहिजे लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम प्रत्येक भारतीय नागरिकाला समजून सांगणे गर्भनिरोधक साधनांचा उपयोग व महत्त्व पटवून देणे, कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया पुरुष व श्रिया दोघांना समजून सांगणे, जातिभेद नष्ट करून बंधुत्वाची भावना निर्माण करणे व समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत कुटुंब नियोजनाचा प्रचार व प्रसार करणे. हिंदू-मुस्लीम एक्क्यास प्रोत्साहन देऊन लोकसंख्या वाढीला आळा घ**** कुटुंब नियोजनावर पथनाट्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून जनजागृती करणे. स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामपंचायती पंचायत समिती, जिल्हा परिषद या मधून अनेक उपक्रम राबवून आपण ग्रामीण भागामध्ये तसेच शहरी भागांमध्ये लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम याविषयी जनजागृती निर्माण करू शकतो. हम दो हमारा किंवा हमारी एक, लहान परिवार सुखी परिवार, कुटुंब नियोजन करूया आणि भारत देशाला सुजलाम सुफलाम करूया असे नारे देऊन आपण आपल्या देशाला प्रगतीपथावर न्यायला पाहिजे तरच आपला देश महान होईल.

अनिरुद्ध बनसोडे
सायन्स कॉलेज, नांदेड



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# क्रिकेटच्या देवाचा वाढदिवस

आधुनिक केसरी

**क्रिकेट हा भारतातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे म्हणूनच क्रिकेट हा भारताचा धर्म आहे असे मानले जाते आणि खेळात सचिन तेंडुलकर याने जी असामान्य कामगिरी केली आहे त्यामुळे त्याला क्रिकेटचा देव मानले जाते. आज याच क्रिकेटच्या देवाचा म्हणजे सचिन तेंडुलकरचा ५० वा वाढदिवस आहे. २४ एप्रिल १९७३ रोजी मुंबईत सचिनचा जन्म झाला. त्याचे वडील रमेश तेंडुलकर हे प्राध्यापक होते तसेच मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक होते तर आई शिक्षिका होत्या.**

त्या काळातील प्रसिद्ध संगीतकार सचिनदेव बर्मन ह्यांच्या नावावरुन त्याचे सचिन असे नाव ठेवण्यात आले. सचिनने शारदाश्रम विद्यामंदिर या शाळेत रमाकांत आचरेकर यांच्याकडून क्रिकेटचे धडे गिरवायला सुरवात केली. रमाकांत आचरेकर यांनी बालवयातच सचिनची गुणवत्ता हेरुन त्याला प्रशिक्षण दिले. शाळेत असतानाच सचिनने त्याच्या शाळेतील सहकारी मित्र विनोद कांबळी याच्यासोबत हॅरिस शिल्ड स्पर्धेत ६६४ धावांची विक्रमी भागीदारी रचली. सचिनने त्याच्या पहिल्या प्रथम श्रेणी सामन्यातच शतक झळकवण्याचा विक्रम केला. तेंव्हा त्याचे वय १५ वर्ष २३२ दिवस होते आणि त्यावेळी पहिल्या सामन्यात शतकी खेळी करणारा तो सर्वात तरुण खेळाडू होता. सचिन हा असा एकमेव खेळाडू आहे ज्याने रणजी, दुलीप व इराणी चषकाच्या पहिल्या सामन्यात शतक झळकावले. देशांतर्गत क्रिकेटमध्ये अप्रतिम कामगिरी केल्याने वयाच्या १६ व्या वर्षीच सचिनची भारतीय संघात निवड झाली. १९८९ साली त्याने आपला पहिला आंतरराष्ट्रीय सामना पाकिस्तान विरुद्ध कराची येथे खेळला. त्या सामन्यात त्याने इम्रान खान, वसीम आक्रम, वकार युनूस, अब्दुल कादिर या दिग्गज गोलंदाजांचा सामना केला. अर्थात त्याला पहिल्या सामन्यात काही विशेष काही करता आले नाही. अवघ्या १५ धवांवर तो बाद झाला मात्र पुढच्या सामन्यात त्याने अर्धशतक झळकावुन आपल्या क्षमतेची चुणूक जगाला दाखवून दिली. त्यानंतर तो भारतीय संघासोबत न्यूझीलंड दौऱ्यावर गेला तिथे ८८ धावांची त्याने लाजवाब खेळी केली मात्र त्याला खरी ओळख मिळाली ती १९९१ - ९२ च्या ऑस्ट्रेलियन दौऱ्यात. या दौऱ्यात त्याने पर्थ मधील उसळत्या आणि वेगवान खेळपट्टीवर शतकी खेळी केली. ज्या खेळपट्टीवर जगभरातील दिग्गज फलंदाज तग धरू शकत नाही अशा खेळपट्टीवर सचिनने ऑस्ट्रेलियाच्या दर्जेदार गोलंदाजीसमोर शतक झळकवल्याने हा खेळाडू लंबी रेस का घोडा आहे असे जाणकार म्हणू लागले. त्यानंतर सचिनने मागे वळून पाहिले नाही. जगभरातील सर्वच खेळपट्टीवर त्याने धावा काढायला सुरवात केल्या. १९९६ च्या विश्वचषकात त्याने सर्वाधिक धावा काढून गोल्डन बॅट मिळवली. १९९० च्या दशकात तर सचिनच्या बॅटने अक्षरशः धुमाकूळ घातला. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्टइंडिज, पाकिस्तान, श्रीलंका, झिम्बाब्वे अशा सर्वच संघविरुद्ध त्याने खोऱ्याने धावा केल्या. १९९७ साली विसडेनने त्याला त्या वर्षीचा सर्वोत्तम वार्षिक खेळाडू म्हणून घोषित केले. ह्याच वर्षी त्याने पहिल्यांदा कसोटीत १००० धावा केल्या. ह्याची सचिनने १९९९, २००१, २००२ साली पुनरावृत्ती केली. सचिनने वर्षात १००० पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम सलग सहा वेळा केला आहे. असा करणारा तो एकमेव खेळाडू आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# एकांकिका प्रकारात धन्वंतरी आयुर्वेद महाविद्यालय प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक राज्यस्तरीय सांस्कृतिक युवा महोत्सव 'स्पंदन-२०२३' (नाट्यकला) स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या राजर्षी शाहू सभागृहात संपन्न झाला.

दोन दिवसीय 'स्पंदन-२०२३' (नाट्यकला) बक्षीस वितरण सोहळा कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे डॉ. मिलिंद निकुंभ (प्रति कुलगुरू, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक) हे अध्यक्षस्थानी तर डॉ. दत्ता पाटील (प्राचार्य, धन्वंतरी आयुर्वेद महाविद्यालय, उदगीर), डॉ. मनोजकुमार मोरे (संचालक, विदयार्थी कल्याण विभाग, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक), डॉ. फुलचंद अग्रवाल (उपरजिस्ट्रार, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), डॉ. श्रीकांत देशमुख (प्राचार्य, CSMSS आयुर्वेद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर ) डॉ. राहुल शिंदे, डॉ. श्रीराम गरड (समन्वयक, स्पंदन २०२३) यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

छत्रपती संभाजीनगर येथे दि. २२ व २३ एप्रिल रोजी छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक राज्यस्तरीय सांस्कृतिक युवा महोत्सव 'स्पंदन-२०२३' (नाट्यकला) मोठ्या उत्साहात पार पडला . छत्रपती संभाजीनगर विभागासाठी नाट्यकला प्रकारात एकांकिका, विडंबन नाट्य, मुकअभिनय (समूह) आणि मिमिक्री हे कलाप्रकाराचे सादरीकरण महाराष्ट्रातील ३२ महाविद्यालयाच्या जवळपास ३७५ विद्यार्थ्यांनी केले.




# दैवत वृद्धाश्रम येथे सामाजिक सलोखा कार्यक्रम



आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** सेवापथ सोशल फाउंडेशन NGO तर्फे बोरवाडी खुलताबाद येथील दैवत वृध्दाश्रम येथे ईद मिलन सामाजिक सलोखा कार्यक्रम घेण्यात आला. आश्रमाचे संचालिका आदरणीय उमा ताई तुपे यांच्या मार्गदर्शनात आश्रमातील आजी आजोबाना शिरखुरमा व मिठाई वाटप करण्यात आली.

सोबतच संस्थेचे कमिटी मेंबर काकासाहेब जाधव यांचा वाढदिवसानिमित्त फळे व मिठाई वाटप करण्यात आली. सुभाष साळवे आणि मयूर भावसार यांनी कार्यक्रमाचे सुंदर नियोजन केले. शेख अफसर यांनी सूत्रसंचालन केले. समीर पठाण यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष शेख अकबर दैवत वृध्दाश्रमाची संचालिका उमाताई तुपे, गीतेश गंगावणे आदींची उपस्थिती होती.

# परतूर येथे परशुराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**परतुर :** गायत्री मंदिर येथे भगवान परशुराम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम भगवान परशुराम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. नंतर गायत्री माता यांच्या आरतीने सुरुवात करण्यात आली गायत्री माता यांच्या आरती नंतर भगवान परशुराम यांची आरती घेण्यात आली या आरतीनंतर समाजातील संस्कृत मध्ये पीएचडी प्रदान केलेले डॉ. प्रतीक प्रमोद जोशी यांचा सत्कार करण्यात आला यावेळी त्यांचे वडील प्रमोद जोशी यांचाही सत्कार करण्यात आला. या वेळी श्याम खंडेलवाल मुरली देशमुख राधेश्याम दायमा सतीश देशपांडे बालाप्रसाद ओझा प्राध्यापक प्रमोद टेकाळे रतन दायमा सुरेश जोशी डॉक्टर नंद राजेश खंडेलवाल विठ्ठल कुलकर्णी नंदकुमार कुलकर्णी योगेश खंडेलवाल दुर्गेश पोतदार श्यामसुंदर चितोडा राम देशपांडे अश्विन दायमा शिवा जोशी अविनाश कुलकर्णी सुनील पारिक नटवर खंडेलवाल किशोर व्यास मेहता महाराज जुगल दायमा मनोज कुलकर्णी लखन जोशी शुभम खंडेलवाल राजेश दायमा शंकर दरगड सखाराम कुलकर्णी श्याम जवळेकर नागरिक सहभागी होते.

# अंनिसमुळे जातिभेद झाला दूर

## आक्षेप घेतलेली वेगळी पंगत झाली बंद !

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** भारत देश स्वतंत्र होऊन सत्तरी ओलांडली मात्र आजही ग्रामीण भागात जातीभेद पाळला जातो. उपेक्षित समाजाची वेगळी गावपंगत बसवली जाते. असाच काही प्रकार नाशिक जिल्ह्यातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले त्र्यंबकेश्वर येथे सुरू होता. मात्र अंनिसने याबाबत आक्षेप घेत लोकप्रबोधन केले आणि उपेक्षित व सवर्ण लोकांची एकत्र पंगत बसली.

त्र्यंबकेश्वर येथे शेकडो वर्षांपासून ग्रामदेवता महादेवीच्या नावाने सुरु केलेली गांव जेवणाची परंपरा अद्याप सुरु आहे. परंतु या पंगतीत विशिष्ट जातीतील लोकांना वेगळा स्वयंपाक व जेवणासाठी वेगळी पंगत बसवली जात होती. महादेवी ट्रस्टकडून ह्या गांव जेवणाचे आयोजन केले जाते. त्यामध्ये साधारण दहा हजार लोक जेवण करतात. मात्र गावातील एका विशिष्ट समाजाच्या भोजनासाठी लागणारे अन्न लोकवर्गणीतून जमा झालेल्या रकमेतूनच खरेदी केलेल्या समानातून वेगळे शिजवले जाते व या विशिष्ट समाजाची भोजनाची पंगत इतर बहुजन समाज बांधवापासून वेगळी बसवली जाते असे महाराष्ट्र अंनिसच्या नाशिक व त्र्यंबकेश्वरच्या कार्यकर्त्यांना कळले. लोकांच्या इच्छेने गावजेवण होत असेल तर त्याला विरोध न करता, ह्या जेवणाचा आनंद घेण्यासाठी येणारे सर्व गावकरी हे एकाच ठिकाणी शिजवलेल्या आणि एकाच पंगतीत वाटप होत असलेल्या अन्नाचा लाभ घेतील, ही भूमिका अंनिसने घेतली. अशा आशयाचे तहसिलदार व पोलिस निरीक्षक यांना निवेदन देत त्यांच्याशी ह्या पंगतीभेदाबाबत सविस्तर चर्चा केली. गांवजेवणात एका विशिष्ट समाजासाठी वेगळ्या ठिकाणी अन्न शिजवणे व त्यांची वेगळी पंगत बसविणे ही अनिष्ट, अमानवीय, राज्यघटनेशी विसंगत असून सामाजिक विषमतेला बळ देणारी बाब असल्याचे सांगितले. अशी प्रथा त्वरीत बंद व्हावी याबाबत तहसिलदार व पोलिस निरीक्षक यांना तोंडी तसेच लेखी निवेदनातून अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे, राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे, डॉ.सुदेश घोडेराव, ॲड.समीर शिंदे, संजय हरळे यांनी आग्रह धरला. मा.तहसिलदार यांनी संबंधित ट्रस्टींसोबत बैठक घेऊन कुठलाही जातीभेद न करता एकत्र पंगत बसविण्यात यावी, कायद्याचे पालन करावे अशा सूचना दिल्या. ट्रस्टींनीही योग्य तो निर्णय घेऊन सर्वांनी एकच पंगतीत भोजन घेण्यासाठी सर्वांना आवाहन केले .त्यामुळे वर्षानुवर्षं चालत आलेली विशिष्ट समाजाची वेगळी पंगत बसण्याची प्रथा ह्या सर्वांच्या प्रयत्नातून संपुष्टात आली.



पंक्तीभेदाबाबत अंनिसने जरी पुढाकार घेतला असला तरी तहसिलदार, पोलिस निरीक्षक व त्यांचे सहकारी, महादेवी ट्रस्ट यांनी प्रथा बंद करण्यासाठी मोठे धाडस दाखवले . ज्या ज्या ठिकाणी कोणत्याही कारणास्तव माणसा माणसात भेद केला जात असेल तो सूज्ञांनी पुढे होऊन थांबविला पाहिजे .
**कृष्णा चांदगुडे, अंनिस, राज्य कार्यवाह**

गावजेवनात पंक्तीभेद होत असल्याचे आमच्या निदर्शनास आले होते . तशा प्रकारच्या तक्रारी स्थानिक भाविकांकडून प्राप्त झाल्या होत्या . त्यामुळे जिल्हा शाखेला सोबत घेऊन प्रशासन व ट्रस्टींशी सुसंवाद केला . त्यातुन हे परिवर्तन झाले आहे . अंनिस याचे स्वागत करत आहे .
**संजय हराळे, कार्याध्यक्ष, अंनिस, त्र्यंबकेश्वर .**

महाराष्ट्र Business Katta












# जमिनीतील पाण्याची काळजी कोणाला ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आपल्या भारतात जगातल्या एकूण लोकसंख्येपैकी  सतरा टक्के लोकसंख्या निवास करते आणि पाण्याच्या उपलब्धतेचे प्रमाण मात्र फक्त चार टक्के आहे.याचे एक मोठे कारण म्हणजे भूगर्भातील घटत चाललेला पाण्याचा स्तर. दुर्दैव असे की, इतक्या वेगाने भूगर्भातील पाण्याची पातळी घटत चालली असताना देशात पाण्याच्या संरक्षणासाठी म्हणावी अशी उपाययोजना होताना दिसत नाही. त्यासाठी कार्यक्रम आखला जात असल्याचे ऐकायला मिळत नाही. यासाठी खास अशा कार्यक्रमाची निर्मिती किंवा विचारसुद्धा करण्यात आलेला नाही.  वास्तविक अशी काही तरी यंत्रणा विकसित होण्याची आवश्यकता आहे, अन्यथा आपल्याला अल्पावधीतच फार मोठ्या जलसंकटाला तोंड द्यावे लागणार आहे.**

युनिस्कोच्या एका अहवालानुसार गेल्या दहा वर्षांत भूजल स्तर 65 टक्क्यांनी खाली गेला आहे. भूजलाचा वापर करण्यात भारत जगात पहिल्या क्रमांकावर आहे. इथे 80 टक्क्यांपेक्षा अधिक पाण्याची गरज भूजलमधून भागवली जाते. सरकारी आकडेवारींमध्येही मान्य करण्यात आले आहे की, भारतात भूजलाचा बहुतांश भाग पाणी उपशासाठी वापरण्यात आला आहे. भारतात दरवर्षी गोड्या पाण्याचा जितका खप आहे, तितका जल संचय होताना दिसत नाही. जागतिक बँकेच्या चार वर्षांच्या आकडेवारीनुसार घरगुती,कृषी आणि औद्योगिक क्षेत्रासाठी दरवर्षी 761 मिलियन म्हणजे 76 हजार 100 कोटी घनमीटर पाण्याचा वापर होत आहे. पाण्याची समस्या गडद होण्याचे आणखी एक मोठे कारण म्हणजे निम्म्यापेक्षा अधिक पाणी प्रदूषित आहे. उद्योग, कारखाने यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पाणी प्रदूषित होत आहे. यामुळे अतिसार,टायफाइड आणि वायरल हेपेटाइटिस-बी सारखे आजार पसरण्याचा धोका असतो.

केंद्रिय भूजल बोर्डाच्या एका अभ्यासानुसार जगातली प्रत्येक दहावी तहानलेली व्यक्ती भारतातल्या खेड्यात निवास करते. खरे तर हा आपल्या काळजीचा विषय व्हायला हवा, कारण आपण पाण्यासारख्या सर्वाधिक मूलभूत गरजेची व्यवस्था आपल्या लोकसंख्येसाठी करू शकत नाही. महिला सक्षमीकरण आणि बेटी पढाओ, बेटी बचाओसारख्या घोषणा आपण करत असलो तरी ग्रामीण भारतात पाणी आणण्याचे किंवा साठवणूकीचे काम मुख्यतः मुली आणि महिलांनाच करावे लागते. पाण्याची समस्या योग्य व्यवस्थापनाअभावी मोठे विक्राळ स्वरुप घेत आहे. निसर्गाने तर आपल्याला मोठ्या प्रमाणात पाण्याची उपलब्धता दिली आहे,परंतु त्याच्या वापराच्या उपयुक्त नेटवर्काच्याअभावामुळे आपल्याला तहानलेला राहण्याचा अभिशाप मिळाला आहे. उत्तर प्रदेशात 89 टक्के, बिहारमध्ये 78 टक्के, उत्तराखंडमध्ये 75 टक्के आणि महाराष्ट्रात 74 टक्के विहिरी, कुपनलिका, ओढे-नाले यांचा जलस्तर घटला असल्याने मोठी समस्या बनली आहे. 1983 मध्ये साधारण 132 फुटावर पाणी लागायचे आता तेच पाणी 2011 पर्यंत 500 ते 800 फुटावर लागत होते. या सहा-सात वर्षात आणखीणच बिकट चित्र पाहायला मिळत आहे.

खालावत चाललेला भूजल स्तर कोणत्या एका देशाचीच समस्या नाही, तर ती विश्‍वव्यापी आहे. याबाबतीत काम करणाऱ्या वाटर एड या संस्थेचे म्हणणे असे की, 2050 पर्यंत जगातील 40 टक्के लोकसंख्या ही पाणी संकटाच्या कवेत असणार आहे. सतत वाढत चाललेले वैश्‍विक तापमान आणि मोसमी वातावरणात होत असलेला अप्रत्यक्ष बदल यामुळे नद्या,तलाव, झरे कोरडे पडत चालले आहेत. जलक्षेत्रासंबंधीची प्रमुख सल्लागार कंपनी ईएच्या अभ्यासानुसार 2025 पर्यंत भारत मोठ्या पाणी संकटाचा देश बनणार आहे. जाणकार आजदेखील पाण्याचे कमी धोकादायक संकट आहे, असे मानत नाहीत. वाटर एड ही संस्था वातावरण बदल याचे प्रमुख कारण असल्याचे मानते. या बदलामुळे एक तर मोठी वादळे येतात किंवा पूरस्थिती निर्माण होते अथवा मोठा दुष्काळ पडतो. राजस्थान,उत्तर प्रदेश, दिल्ली परिसरात अशी परिस्थिती उदभवू लागली आहे.



आपल्या देशात मनमानी आणि बेसुमार पाण्याचा वापर होत आहे. पाण्याचा अपव्ययव आणि व्यवस्थापनेचा अभावदेखील पाणी समस्या निर्माण व्हायला कारणीभूत आहे. त्यामुळे डार्क झोन ( असे ठिकाण जिथून पाणी काढणे शक्य होत नाही ) वाढत चालले आहे. पाण्याचा अविवेक वापर आपल्याला चोहोबाजूला दिसत आहे. पण यावर प्रतिबंध घालण्याचा सुविचार कुणाच्या मनात येताना दिसत नाही. राजकीय पक्ष,लोकप्रतिनिधी आदींना फक्त आपण निवडून येण्याची व  सत्तेवर बसण्याचीच चिंता अधिक दिसून येते. सरकारी अधिकाऱ्यांमधला वाढत चाललेला भ्रष्टाचार आणि त्यांना लोकप्रतिनिधींची मिळत असलेली साथ म्हणजे आपण दोघे भाऊ भाऊ, दोघे मिळून खाऊ, या नीतीची आहे. त्यामुळे देशावर ओढवलेल्या संकटांचा कुणी विचारच करताना दिसत नाही. आणि हे आपल्या देशासाठी धोकादायक तर आहेच आणि लोकशाहीसाठी दुर्दैवी आणि मारकही आहे. असे कधी कधी वाटते की, पाण्याचे व्यावसायिकीकरण केल्याशिवाय लोक सुधारणार नाहीत, त्यांना पाण्याची किंमत कळणार नाही. पण पाण्याची उपलब्धतेला क्रयशक्तीशी जोडणे योग्य होणार नाही. पाणी सर्वांची आणि काळाची गरज आहे. सर्वांच्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे. पण पाण्याचा दुरुपयोग थांबवण्यासाठी दुसरा पर्याय स्वीकारण्याचीही गरज आहे.

भूजल स्तर कमी होण्याला फक्त पावसाचे प्रमाण कमी होणे हेच एक कारण नाही तर नैसर्गिक स्त्रोत आटणे, आणि अनियंत्रित विकासदेखील जबाबदार आहे. शेती, कारखान्यांना पाण्याची आवश्यकता भरपूर लागत आहे.अमर्याद वृक्षतोडदेखील त्याला कारणीभूत आहे. पूर्वी पावसाचे पाणी जमिनीच्या खाली साठवले जाऊन पाण्याची पातळी कायम राखली जात होती. आज तेच पाणी वाया जात आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंगची अंमलबजावणी न होणे हा देखील भूजल स्तर कमी होण्याचे महत्त्वपूर्ण कारण आहे. शिवाय पाणी विषारी होणे, याहीपेक्षा मोठा चिंतेचा विषय झाला आहे. वाटर एड च्या शोध अहवालानुसार या गोष्टीला पुष्ठीच मिळाली आहे. या अहवालानुसार देशातल्या साडेचारशेपेक्षा अधिक जिल्ह्याचे भूजल खूपच प्रदूषित झाले आहे. या जिल्ह्यातल्या जमिनीतील पाण्यात फ्लोराइड, आर्सेनिक, आयर्न, शिसे, नायट्रेड सोडियम आणि क्रोमियमसारखे घातक रसायन मिसळत आहेत.

स्वातंत्र्य काळात देशात परमाणशी पाण्याची उपलब्धता सात हजार क्यूबिक मीटर होती. आता ती कमी होऊन 2001 मध्ये दोन हजार क्यूबिक मीटर उरली आहे. आता तर देशाची लोकसंख्या सव्वाशे कोटीच्यावर पोहचली आहे. भूशास्त्रज्ञांच्या मतानुसार 2025-26 पर्यंत ही उपलब्धता आणखी घटून बाराशे क्यूबिक मीटर राहील. जागतिक बँकेचे म्हणणे असे की, भारतात 48 टक्के भागात पाण्याची समस्या आहे आणि त्यातील 24 टक्के पाणी विषारी बनले आहे. भू-शास्त्र अभ्यासानुसार जल संधारणासाठी चरी पाडणे महत्त्वाचे आहे. पावसाचे पाणी जिरवण्यासाठी सामान्य आकाराच्या तीन हजार चरी पाडल्या तरी त्यातून तीस कोटी लीटर पाणी जिरवू शकतो. काही विकसनशील देशांमध्ये सरकार आणि सामान्य लोक यांच्या सहभागातून पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढवल्याची उदाहरणे  आहेत. आपल्या देशात वर्षा जल संचयाची परंपरा फार प्राचीन आहे. राजस्थानमध्ये पावसाचे पाणी सुरक्षित साठवून ठेवण्यासाठीचे काम सरकारी मदतीशिवाय सामाजिक स्तरावर कित्येक वर्षांपासून केले जात  आहे. मंदिरांजवळ तलाव, विहीर बनवण्याची परंपरादेखील फार जुनी आहे. पण आज आपल्या धरणीकडून जितके पाणी आपण घेत आहे, त्याच्या तुलनेत आपण परत मात्र फार कमी देत आहोत. रोजच्या रहाटगाडग्यात पाण्याचा अपव्यय रोखूनही आपण पाणी वाचवू शकतो. पाण्याविषयीचा आपला विचार बदलण्याची गरज आहे. निसर्गाने पाणी मोठ्या प्रमाणात निःशुल्क उपलब्ध करून दिले आहे, त्याचे खरे तर आभार मानण्याची गरज आहे. त्यामुळे पाण्याचा काटकसरीने आणि पाहिजे तेवढाच वापर करण्याची आवश्यकता आहे.

# रोनाल्ड रॉस आणि मलेरिया डास!




श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**धक्कादायक असे की, मलेरिया- हिवताप आजाराच्या उच्चाटनासाठी २५ एप्रिल या दिवशी भलेही जागतिक मलेरिया दिन साजरा होतो. मात्र वास्तव असे की, जगभरात प्रत्येक दोन मिनिटांना एका बाळाचा अथवा लहान मुलाचा मृत्यू केवळ मलेरियाने होतो. ही जागतिक पातळीवरील सरासरी आहे. मलेरिया हा डासांच्या चावण्यामुळे होणारा रोग आहे.  डासांद्वारे त्याचा प्रसार होतो. याचा प्रादुर्भाव विषुववृत्तीय भागांत जास्त आहे. आपण डॉक्टर नाही, तरी सतर्कतेसाठी हे ठावे असावे. मलेरियाचे गांभीर्य लक्षात घेता जागतिक मलेरिया दिन पाळण्याची निकड भासू लागली.    मलेरियाला समूळ संपवण्यासाठी डब्ल्यूएचओ व आरबीएम एकत्र आले आहेत. त्याच्या समूळ उच्चाटनासाठी राजकीय, सामाजिक पातळीवर एकत्र येणे, विशिष्ट अजेंडा तयार करणे अशी त्यांची संकल्पना आहे.**

प्रोटोजुअन प्लाज्मोडियम नावाच्या कीटाणूच्या एनोफिलीज मादी डासापासून मलेरिया  होतो. आजवर या आजाराने जगभरात अनेकांचे बळी घेतले आहेत. या आजाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न सुरु असतानाच अवघे जग आज कोरोना व्हायरस अर्थातच कोव्हिड-१९ या विषाणूचा सामना करत आहे. जागतिक आरोग्य संघटना डब्ल्यूएचओने या विषाणूचे वर्णन साथिचा आजार असे केले आहे. दरम्यान जागतिक आरोग्य संघटनेने मलेरिया आणि इतर साथींच्या आजारांचा अनुभव लक्षात घेता जगभरातील देशांनी कोरोनाचे संकट लवकरात लवकर कसे निपटता येईल, यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलावीत. महत्त्वाचे असे, की आज जागतिक मलेरिया दिन आहे. प्लाझमोडियम या जातीच्या डासांमुळे होणारा हा रोग तसा फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकात हिपोक्रॅटिस यांना मलेरिया सदृश्य आजार माहीत होता. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात जैलुइट लोकांनी पेरू देशात सिंकोना ही वनस्पती आणली होती. या सुमारास जेव्हा युरोपमध्ये फार मोठ्या प्रमाणात मलेरियाची साथ आली. तेव्हा या सिंकोना वनस्पतीचा त्या तापावर उपचार करण्यात आला होता. या उपचारांमुळे मलेरिया आणि अन्य प्रकारचे ताप यांतील फरक सिडनर्हेम आणि अन्य वैद्यांना ओळखणे शक्य झाले. इ.स. १८८०मध्ये लेव्हेरान यांनी मलेरिया निर्माण करणाऱ्या डासांचा शोध लावला, परंतु या डासांचे प्रामुख्याने जे तीन प्रकार आहेत, त्याचा शोध त्यावेळी लागला नव्हता.

जागतिक मलेरिया दिन हा २५ एप्रिल रोजी जगभर साजरा केला जातो. इ.स.२००८मध्ये अफ्रिकेत हा दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला. मलेरिया या साथीच्या आजाराने आजवर जगभरात अनेकांचा बळी घेतला आहे. त्यामुळे अवघ्या जगाने एकत्र येत मलेरिया आजाराचे संपूर्ण उच्चाटन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जागतिक मलेरिया दिन साजरा केला जातो. सन २००७ या वर्षाच्या मे महिन्यात भरलेल्या साठव्या जागतिक आरोग्य परिषदेत हा दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. या परिषदेला उपस्थित असलेल्या ४४ देशांनी एकमुखाने ही घोषणा केली. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या आकडेवारीनुसार सन २००० ते २००४ या कालावधीत मलेरियामुळे होणाऱ्या मृत्यूच्या प्रमाणात मोठी घट झालेली दिसते. या काळात मृत्यूदर सुमारे ४० टक्क्यांनी घसरला आहे. ही आनंदाची बाब आहे. जागतिक आरोग्य संघटनेचा २०१९चा अहवाल सांगतो, की सन २०१४ ते २०१८या काळात मात्र मलेरियाचा प्रादुर्भाव कमी करण्यात जागतिक पातळीवर विशेष यश आले नाही. साधारण सन २०१७मध्ये मलेरियाने जेवढे मृत्यू झाले तेवढेच २०१८मध्येही झाले. त्यामुळे मलेरिया उच्चाटनाचे महत्त्व अधिक वाढले आहे. हा डास मलेरियाचा वाहक आहे. या डासांचे नियंत्रण हा मलेरिया रोखण्याचा परिणामकारक उपाय आहे. इ.स.१८९४ साली रॉस यांनी या संदर्भात पुढील संशोधन करण्याचे ठरविले. त्यांनी, ज्या रोग्यांना मलेरिया झाला आहे. त्यांना चावा घेण्यास डासांना उद्युक्त केले. या मलेरिया ग्रस्त रोग्यांना डास चावल्यावर, त्या डासांच्या शरीरात मलेरियाच्या जंतूंचे काय होते ? कोणकोणते आणि कसे बदल होतात ? याचा अभ्यास सुरू केला; परंतु पहिली दोन वर्षे त्यांत फारशी प्रगती झाली नाही, तरीही नाउमेद न होता त्यांनी अभ्यास चालूच ठेवला होता. इ.स. १८९७मध्ये त्यांच्या प्रयत्नांना यश आले. त्यांना दिसून आले की, डासांच्या जठरामध्ये बटणाच्या आकाराच्या जंतूंची अनेक अंडी तयार होतात. ही अंडी त्या डासांच्या लाळेत येतात आणि असे डास जेव्हा माणसांना चावतात तेव्हा त्या माणसांमध्ये पुरेशी प्रतिकारशक्ति नसेल त्यांना मलेरिया होतो. हे त्यांचे संशोधन बहुमोलाचेच होते.



इ.स.१८९४मध्ये मॅनसन यांनी असे गृहीतक मांडले, की मलेरिया हा रोग डासांमुळे होत असून तो या जंतूंनी युक्त डास चावा घेऊनच नव्हे, तर पाण्यावाटे पसरवीत असावेत. पुढे इ.स. १८९८मध्ये रॉस यांनी मलेरिया डासांमुळे नेमका कसा होतो, याचा शोध लावला. पक्ष्यांमधील मलेरिया प्रमाणेच मानवी शरीरांतही घडामोडी होत असल्या पाहिजेत, असे त्यांना दिसून आले. त्याच वर्षी ग्रासी, बिगनमी आणि बास्टिनेली यांनी ॲनोफेलिस जातीच्या डांसामध्ये प्लाझमोडियम, फाल्सिपॅरम या जातीच्या मलेरियाच्या जंतूंची कशी वाढ होते आणि पुढे ते संसर्गित डास चावल्यामुळे माणसांमध्ये मलेरिया कसा होतो, हे दाखवून दिले. मलेरिया तापात थंडी वाजून ताप येणे आणि पुन्हा तीन चार दिवसांनी ताप येण्यामुळे शरीरात हिमोझाईन हा विषारी पदार्थ दिसून येतो. यामध्ये दोन प्रमुख- १ ) मलेरियाचे जंतू आणि त्यांचे वातावरण आणि २ ) ॲनॉफिलस जातीचे डास आणि त्यांचे वातावरण या घटकांचा विचार केला पाहिजे. डासांच्या शरीरांतील मलेरियाच्या जंतूंच्या घडामोडीविषयी आणि हा मलेरिया मानवी शरीरात कसा संक्रमित होतो, याविषयी सर रोनॉल्ड रॉस यांनी मूलभूत संशोधन केले व पुढील अभ्यासकांना दिशा दाखविली. विशेष म्हणजे संशोधनाचे हे कार्य त्यांनी बव्हंशी आपल्या हिंदुस्थानात कलकत्ता आणि बंगलोर येथे केले. या संशोधनासाठी इ.स.१९०२चे नोबेल पारितोषिक त्यांना मिळाले. रोनाल्ड रॉस यांचा जन्म अलमोडा येथे इ.स.१८५७मध्ये झाला. त्यांचे वडील सर सी.सी.जी.रॉय हे इंग्रजांच्या सैन्यामध्ये जनरल होते. रोनाल्ड रॉस यांचे शिक्षण इंग्लंडमध्ये झाले आणि वैद्यकाच्या अभ्यासासाठी त्यांनी इ.स.१८७५ मध्ये लंडन येथील सेंट बार्थिलोमोव्ह हॉस्पिटलमध्यें प्रवेश घेतला. इ.स.१८८१मध्ये डॉक्टर झाल्यावर ते इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्ये काम करू लागले. डासांमुळे मलेरिया होत असावा असा काहीसा तर्क त्यापूर्वी एक शतक आधी करण्यात आला असला, तरी त्यावर पुरेसा प्रकाश टाकण्यात आलेला नव्हता. मलेरिया नेमका कसा होतो ? तो कसा पसरतो व त्याला प्रतिबंधक कसा करता येईल ? याबद्दल त्यावेळी निश्‍चित स्वरूपाची काहीही माहिती उपलब्ध नव्हती.

मलेरिया रूग्णात- १ ) थंडी वाजण्याचा त्रास सुमारे १५ मिनिटे ते तासभर चालतो. २ ) थंडी वाजून ताप येतो. ताप थोडा वेळ टिकतो. ३ ) ताप कमी होताना घाम येऊन उतरतो. ४ ) ताप सहसा दुपारनंतर येतो. ताप सहसा दिवसाआड किंवा रोज येतो. ५ ) तापाबरोबर खूप डोकेदुखी, अंगदुखी, कंबरदुखी, थकव, इत्यादी लक्षणे जाणवतात. पण हे वेळापत्रक अगदी पक्के नसते. याबरोबर पाठही दुखते. मलेरिया सौम्य असेल किंवा उपचार अर्धवट झाले तर लक्षणे सौम्य असतात. कधीकधी फक्त अंगावर काटा येणे, डोके दुखत राहणे, थकवा जाणवणे एवढीच लक्षणे असतात. अशा तक्रारी खूप असतात. रक्तनमुना तपासल्याखेरीज याचा नक्की निर्णय करणे अवघड असते. मलेरियाच्या तापामुळे काही वेळा मेंदूला सूज येऊन झटके येण्याची शक्यता असते. ही शक्यता बालकांमध्ये जास्त प्रमाणात आढळते. प्लास्मोडियम फाल्सिपॅरम प्रकाराच्या जंतूंमुळे रुग्ण कोमात जायची व दगवण्याची शक्यता असते. काही रुग्णांत मूत्रपिंड निकामी होऊन लघवीत फुटलेल्या लाल रक्तपेशी दिसून येतात.

धक्कादायक असे की, मलेरिया- हिवताप आजाराच्या उच्चाटनासाठी २५ एप्रिल या दिवशी भलेही जागतिक मलेरिया दिन साजरा होतो. मात्र वास्तव असे की, जगभरात प्रत्येक दोन मिनिटांना एका बाळाचा अथवा लहान मुलाचा मृत्यू केवळ मलेरियाने होतो. ही जागतिक पातळीवरील सरासरी आहे. मलेरिया हा डासांच्या चावण्यामुळे होणारा रोग आहे. डासांद्वारे त्याचा प्रसार होतो. याचा प्रादुर्भाव विषुववृत्तीय भागांत जास्त आहे. आपण डॉक्टर नाही, तरी सतर्कतेसाठी हे ठावे असावे. मलेरियाचे गांभीर्य लक्षात घेता जागतिक मलेरिया दिन पाळण्याची निकड भासू लागली. म्हणून सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि डासांनाना पिटाळण्याच्या पद्धती प्रकर्षाने अवलंबिणेच फायद्याचे राहील.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर का केले ?




विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर केल्यामुळे अनेक लोकांनी बाबासाहेब आंबेडकर यांना हिंदू धर्मविरोधी घोषित केले. परंतु यात कोणतेही तथ्य नाही कारण देशांमध्ये विषमता, पाखंडता, अज्ञान, भोंदुगिरी अंधश्रद्धा, यावरती कोणीही बोलले तरी आजही स्वतःला कट्टर हिंदू समजणारे अशा संत व महापुरुषांचे विचार स्वीकारायला तयार नाहीत. यावरून त्यांची बौद्धिक पातळी लक्षात येते. बाबासाहेब आंबेडकर हिंदू विरोधी किंवा इतर कोणत्याही धर्माच्या विरोधात नव्हते. तरीही त्यांनी धर्मांतरण का केले यावर चर्चा होणे आवश्यक आहे. आपण खोलवर न जाता ढोबळमानाने धर्मांतराची कारणे जर बघितली तर आपल्याला समजून येईल की हिंदू धर्मामध्ये विषमता, अंधश्रद्धा, पाखंड खूप मोठ्या प्रमाणात पसरवलेली आहे.**

लोकांना धर्माच्या नावाखाली पाखंड, विषमता, आणि अंधश्रद्धेमुळे भावनिक बनवून त्यांना मानसिक व शारीरिक अपंग बनवून इतर खालच्या जातींविषयी सामाजिक व सामाजिक जनतेला कुठेही थारा मिळत नाही. एवढी विषमता धर्मामध्ये आहे आणि ती आजही आहे हे नाकारता येणार नाही. परंतु एखाद्या समूहाचा सामुदायिक विकास व्हायचा असेल तर विषमता, भेदभाव, पाखंड, अंधश्रद्धा या गोष्टी दूर केल्याशिवाय विकास होऊ शकत नाही. आणि मुळात हिंदू धर्म अंधश्रद्धा, अज्ञान, पाखंड, भोंदूगिरी या गोष्टीला एवढा चिटकून बसलेला आहे की हिंदू धर्माला धर्मातीलच माणसाचा स्पर्श झाल्याने माणूस बाटतो, हिंदू धर्मातील माणसाला हिंदू धर्मातील माणसाने त्याच्यासमोर माणसासारखे वागणे जसे नवीन कपडे घालणे,घोड्यावर बसणे, ऐटीत चालणे, मंदीरात जाणे, अशा पद्धतीचे वर्तन मान्य करत नाही. हिंदू धर्मातील व्यक्तीने हिंदू धर्मातीलच पाणवट्यावर जाऊन पाणी भरणे हे सुद्धा पाप मानले जायचे. काही ठिकाणी आजही हे घडत आहे. याला कारणीभूत होते ते हिंदू धर्मातील विषमतेवर आधारित जातीव्यवस्था. या जाती व्यवस्थेमध्ये उच्च जातीतील लोक खालच्या जातीतील लोकांना पशुसारखे वागवून त्यांना गुलाम बनवण्याचा प्रयत्न केला जात असे. अर्थात हिंदू धर्मातील वरच्या जातीतील लोक मानसिक स्वातंत्र्यात होते असे मुळीच नाही. आणि म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्मातील विषमतेवर आधारित चालीरीती प्रथा दूर सारून समतेवर आधारित समाज व्यवस्था निर्माण व्हावी, माणसाला माणूस म्हणून वागणूक मिळावी यासाठी खूप प्रयत्न केलेत. परंतु त्या ठिकाणी सुद्धा जातच आडवी येत होती. बाबासाहेबांसारखा विद्वान व्यक्ती हिंदू धर्मातील उणीवांवर बोलतो, दोष बाजूला सारून हिंदू धर्माला एक वेगळ्या उंचीवर बघण्याची जी स्वप्न पूर्ण करण्यासाठी जे प्रयत्न करत होते त्या प्रयत्नावर धर्मांधानी केवळ बाबासाहेब आंबेडकर खालच्या जातीतील आहेत म्हणून दुर्लक्ष तर केले, परंतु धर्मामध्ये कोणत्याही पद्धतीची सुधारणा करण्याची त्यांनी तत्परता दाखवली नाही. विषमता नसायला पाहिजेत असे त्यावेळेस अनेक हिंदू धर्मातील नेत्यांचे मत होते, परंतु समतेसाठी लढण्याचा कुणीच प्रयत्न केला नाही. जात नष्ट करून एकमेकांना समतेची वागणुक देणे, सर्वांना एकत्र आणून सामाजिक समता घडून आणणे, खालच्या जातीतील लोकांना वरच्या जातीतील लोकांसोबत पानापानाचे सन्मानाची वागणूक देणे. त्यांच्यासोबत रोटी व्यवहार बेटी व्यवहार करणे या पद्धतीची कोणत्याही कृत्य त्यावेळी करण्याचा प्रयत्न कोणत्याही लोकांनी केला नाही. व त्याला समर्थन दिले नाही. याचाच अर्थ हिंदू धर्म कोणत्याही प्रकारची सुधारणा करण्यास तयार नव्हता. परंतु मागासलेल्या लोकांचा विकास करायचा असेल, त्यांना प्रवाहामध्ये आणायचे असेल तर धर्मातीलच जातीमध्ये जरी विखुरली गेलेले असतील तर शेवटच्या जातीचा विकास हिंदू धर्मात राहून होणे शक्य नव्हते. ही बाब बाबासाहेबांनी ओळखली होती कारण हिंदू धर्म हिंदू धर्मातील लोकांसोबत विषमता, अंधश्रद्धा, पाखंड, आणि या गोष्टी पसरवत असतो. इतर धर्मातील लोकांसोबत मात्र हिंदू धर्माचे सलोख्याचे व प्रेमाचे संबंध होते. हजारो वर्षांपासून हिंदू धर्मात अस्पृश्यता रुजलेली होती माणसाचा माणसाला बाट होत होता परंतु ही असू शकतात हिंदू धर्मातीलच मांग, महार, चांभार जातीव्यवस्थेत खालच्या असलेल्या जाती जातींनाच लागू होती. मुस्लिम,ख्रिश्चन धर्मा सोबत अस्पृश्यतेने वागत नव्हते. किंवा त्यांना अस्पृश्य समजत नव्हते. याचाच अर्थ धर्म सोडल्याशिवाय मानपान, सन्मान, समता, स्वातंत्र्य व विकासाचे दरवाजे उघडणार नव्हते. म्हणून माणसाच्या विकासाची दरवाजे उघडण्यासाठी समाजामध्ये समता, बंधुता, स्वातंत्र्य निर्माण करण्यासाठी धर्मांतरण करणे हीच गोष्ट बाबासाहेबांना योग्य वाटली. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा 1935 ला केली परंतु त्या अगोदर आणि नंतरही बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्मातील अनिष्ट, चुकीच्या रूढी परंपरेमध्ये बदल व्हायला पाहिजेत, हिंदू धर्माच्या संहितेमध्ये सुधारणा व्हायला पाहिजेत यासाठी अनेक प्रयत्न केले. परंतु विषमतेवर आधारित असलेल्या धर्माचा आधार घेऊन नेत्यांनी समता, स्वातंत्र्य, न्याय व स्वाभिमान याविषयी पाहिजे तसे समर्थन केले नाही ,व या विषयांमध्ये जास्त रस दाखवला नाही. गोलमेज परिषदेमधून स्वतंत्र मतदार संघ, शिक्षण, आरक्षण, सार्वजनिक ठिकाणी प्रवेश अशा प्रकारचे मागण्या मंजूर करून घेतल्या होत्या. परंतु वरील मागण्यांना गांधींनी विरोध करून उपोषण केले. व समोर हेच उपोषण पुणे करार या नावाने इतिहासामध्ये नमूद झाले. शिक्षण आरक्षण, स्वतंत्र मतदार संघ, आणि सार्वजनिक ठिकाणी प्रवेश या साध्या गोष्टी नाकारून कोणत्याही समाजाचा विकास होणार नाही. व समता प्रस्थापित होणार नाही याची जाणीव बाबासाहेब आंबेडकरांना होती. त्यानंतरही बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बिलांच्या मार्फत हिंदू धर्मातील सुधारित संहिता निर्माण केली सुद्धा. समतेवर आधारित



न्यायवर आधारित होती. परंतु डोक्यामध्ये असलेल्या जातीयतेची घाण आणि विषमता यामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुधारणावादी विचारांना त्यावेळी खूप विरोध झाला. आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर धर्म बुडवायला लागलेत अशा प्रकारचे टीका सुद्धा झाल्यात. काही लोकांनी तर बाबासाहेब आंबेडकर तुम्ही हिंदू धर्म सोडणार आहात म्हणून अशी घोषणा केल्यानंतर हिंदू धर्मातील अनिष्ट रुढी परंपरा व सुधारण्यावर बोलण्यात काही अर्थ नाही. अशा पद्धतीने त्यांनी आपापली बौद्धिक पातळी सुद्धा दाखवून दिली. हिंदू धर्मामध्ये जर अनिष्ट रूढी परंपरा अंधश्रद्धा भोंदुगीरी ह्या गोष्टी दूर करून हिंदू धर्माने सुधारणा करून घेतली असती तर, कदाचित डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर केले नसते. परंतु हिंदू धर्म धर्मातीलच लोकांना विषमतेमध्ये ठेवून खालच्या जातीतील लोकांच्या सामाजिक शैक्षणिक, राजकीय व भौतिक विकासाची कास न धरता, धर्माच्या नावावरती जातिव्यवस्थेत वरच्या स्थानी असलेल्या लोकांचा विकास करून घेतला जातो, आणि खालच्या जातीतील लोकांना अजूनही दूर ठेवले जाते. आणि त्यामुळे समता व न्याय या गोष्टी तर लागू होत नाहीत. उलट खालच्या जातीतील लोकांना वर येण्यासाठी कोणतीही अपेक्षा व सहकार्य नसते. आणि धर्माचा विकास दाखवताना हे लोक वरच्या जातीतील लोकांचा विकास दाखवून इतरांना मात्र अज्ञान ,विषमता, अंधश्रद्धा, पाखंड अशा बाबींमध्ये गुरफटून ठेवतात. आणि ही परिस्थिती आजही बदललेली नाही. म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी न्याय, हक्क ,समता, स्वातंत्र्य बहाल करून स्वाभिमान निर्माण करण्यासाठी धर्मांतराची आवश्यकता आहे. हे जाणून घेऊन धर्मांतराचे पाऊल उचलले. धर्मांतर केल्याने स्वतः ची ओळख निर्माण होऊन आपण स्वाभिमानी जिवन जगु शकतो याची खात्री बाबासाहेब आंबेडकर यांना होती. जातीय उतरंडी मध्ये खालच्या जातीच्या लोकांना हक्क, अधिकार व विकास यापासून आजही दुर ठेवले जात आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना माहिती होते. लोकांना जातीमध्ये विभागल्याने, उच्च निच केल्याने छोट्या समुहातील लोक आवाज उठवू शकत नाहीत, आणि याच लोकांच्या अज्ञान व अंधद्धेचा फायदा राजकारण व धर्मकारण टिकवण्यासाठी केला जातो. खालच्या जातीला हिंदु धर्म स्वतः च्या धर्मातील माणतच नाही म्हणून त्या जायीवर अन्याय अत्याचार होतात. म्हणून धर्मांतर करण्यामागे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची भावनीक, अंधश्रद्धा युक्त भुमिका नसुन सर्वसमावेशक व मानवतेची भुमिका होती. म्हणून धर्मांतर करून बाबासाहेब आंबेडकर यांनी आणि बाबासाहेबांनी सामाजिक क्रांती घडवून आणली. धर्मांतरचे जे स्वप्न बघितले होते तेही पूर्ण झाले त्यानंतर मानसन्मामुळे स्वाभिमान, मानसन्मान व विकासाची सर्वदारी मोकळे झाले.

वेगळी व स्वतंत्र ओळख निर्माण झाली. हिंदू धर्मामध्ये असलेल्या अनेक जातींना आजही स्वतंत्र अस्तित्व नाही, स्वाभिमान नाही, किंवा धर्माच्या नावावरती जो काही विकास दाखवल्या जातो त्या विकासामध्ये सहभागी करून सुद्धा घेतले जात नाही. भारतीय संविधानाने वेगवेगळ्या अधिकारांद्वारे सर्वांना आरक्षणाच्या माध्यमातून संधी निर्माण करून दिल्या हे सर्व असताना सुद्धा प्रगत सुशिक्षित वैचारिक म्हणून आज बौद्धांकडे बघितले जाते. समतेची गोष्ट करणारा, न्यायची गोष्ट करणारा, देशहिताचे व संविधानाची गोष्ट करणारा व्यक्ती जर कोठे असेल तर त्याला आपण बुद्धीस्ट आहात का अशीच विचारणा केली जाते. याचाच अर्थ धर्मांतरामुळे लोकांना सामाजिक सन्मान स्वाभिमान व एक स्वतंत्र ओळख निर्माण झाली आणि त्यामुळेच धर्मांतरानंतर एका मोठ्या वर्गामध्ये बाबासाहेबानी स्वाभिमानासोबतच सर्वांगीण विकासाची ऊर्जा सुद्धा भरली. आपण वरील गोष्टीचा जर विचार केला तर बाबासाहेब आंबेडकरांना धर्मांतराची गरज भासली कारण धर्मामध्ये असलेली विषमता, पाखंड, अंधश्रद्धा आणि एकच धर्मात राहून सुद्धा खालच्या जातीचा द्वेष, धर्मातीलच लोकांनी धर्मातील जातींवर अन्याय अत्याचार करणे, ह्या गोष्टी मानवतेला काळीमा फासणाऱ्या होत्या आणि आजही आहेत म्हणून धर्माने माणसाला माणुसकी शिकवावी, स्वतंत्र देणारा, समता देणारा धर्म पाहिजे होता आणि हिंदू धर्म सुधारणा करण्यामध्ये तयार नव्हता म्हणून समता, बंधुता न्याय व स्वातंत्र्य बुद्ध धम्म देत होता म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी धम्माची दीक्षा घेऊन लाखो लोकांचा उद्धार केला. लोकांच्या उद्धाराला धर्मांतरण सुद्धा खूप महत्त्वाचे आहे. कारण आजही हिंदु धर्मामध्ये ज्या इतर जाती आहेत त्यांना हिंदु धर्म स्वतः चे मानत नाही. खालच्या जातीतील लोक संविधानामुळे नोकरी करून आर्थिक संपन्न झाले आहेत. परंतु धर्म आजही त्यांना वरच्या श्रेणीत माणत नाही. आणि अशाच गोष्टी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना पटत नसल्याने त्यांनी धर्मांतर केले.

# आदिवासी समाजाची कुटुंब व्यवस्था



डॉ. ज्योती रा. रामोड
संपर्क क्र. 9673774269

आधुनिक केसरी

**कुटुंब हा मानवसमाजातील सर्वात महत्त्वाचा नातेगट असतो. सर्व नातेसंबंधांस कुटुंबापासून सुरुवात होते. कुटुंब द्विपक्षीय नातेसमूह असतो. माता व पिता या दोहोंच्या नातेवाईकांशी व्यक्तीचा संबंध येतो. समाज पितृनामी, पितृसत्ताक, पितृनिवासी, पितृवंशी किंवा मातृनामी, मातृसत्ताक, मातृनिवासी, मातृवंशी असतो. याचा अर्थ पितृवंशी समाजात व्यक्तीचा मातृसंबंधीयांशी नातेव्यवहार राहत नाहीत, असा नाही. रोजच्या व्यवहारात व समारंभात दोन्ही बाजूंच्या नातेवाईकांचा संबंध येतो.**

मातापित्यांचे अपत्यांवर प्रेम तर असतेच, शिवाय त्यांचा एक आर्थिक सहकारी गट निर्माण झालेला असतो. यास बीजकुटुंब म्हणतात. विवाह केवळ लैंगिक सुखाकरिता केला जात नाही. विवाहामुळे एक आर्थिक समूह घडविला जातो. काही आदिवासी विवाहबाह्य संबंध ठेवू शकतात; पण स्वयंपाक करावयास, मातीची भांडी बनविण्यास, चटया विणण्यास त्यास सहचारिणी हवी असते. तो तिला राहण्यास घर व अन्न देतो.

समाजात अनेक जातीचे, धर्माचे लोक एकत्र राहतात. प्रत्येक व्यक्ती हा कुटुंबाचा एक महत्त्वपूर्ण भाग असतो. तसेच प्रत्येक समूह सदस्यांचे वय, लिंग, धर्म, वस्तीस्थान, दर्जा, व्यवसाय, समाज, परस्पर संबंध इ. अनेक बाबींवर आधारित असतो. अशा समूहापैकी सदस्यांचा आप्तसंबंधांच्या बंधनांवर आधारलेल्या सामाजिक समूहाला कुटुंब असे म्हणतात. आप्तसंबंध हे रक्त आणि वैवाहिक संबंधांतून निर्माण होतात. कुटुंबातून एक भावना, प्रेम, आदर, आपुलकी, त्याग, सहानुभूती निर्माण झाली. कुटुंबासारखा एक प्राथमिक गट आदिवासी समाजातच नव्हे तर पूर्ण समाजात उदयाला आला. कुटुंब असे एक मूलभूत आहे की, ज्यात मुलापासून प्रौढापर्यंत सातत्याने सामाजिकीकरण होत राहते. आदिवासी कुटुंबात सदस्य संख्या दोनपेक्षा अधिक किंवा जास्तीत जास्त दहापर्यंत असते. स्त्री-पुरूष विवाहसंबंधांतून संततीची निर्मिती होणे व यांतून कुटुंबाची रचना केली जाते. म्हणजेच कुटुंबाचा मूलाधार स्त्री-पुरूष या दोन्ही घटकांना समान महत्त्व आहे. प्रत्येक व्यक्तीला सह जीवनाचा आस्वाद कुटुंबातूनच मिळत असतो. प्रजनन, शिशु संगोपन परस्परांना सहकार्य या गोष्टी आपोआप घडून येतात. प्राचीन काळात आदिवासी कुटुंबपद्धती प्रामुख्याने मातृसत्ताक होती. परकीय प्रभाव पडल्याने त्यात बदल होऊन काही ठिकाणी आदिवासी कुटुंबपद्धती पितृसत्ताक झालेली आहे. काही ठिकाणी मात्र आजही मातृसत्ताक पद्धती यातून भाऊ, बहिण, मातापिता असे नाते निर्माण होतात. यातून एकमेकीविषयी असलेल्या कर्तव्याची जाणीव होते. आदिवासी समाजात व्यक्तीपेक्षा कुटुंब मोठे हे सूत्र महत्त्वाचे आहे. भारतातील आदिवासी समाजात कुटुंबांचे सर्व प्रकार आढळून येतात.

**१) प्राथमिक कुटूंब :**

यांत माता पिता आणि मुले यांचा समावेश होता. कुटुंब पद्धती काही ठिकाणी पितृसत्ताक व काही ठिकाणी मातृसत्ताक स्वरूपाची असते. सदस्य संख्या कमी प्रमाणात असते.

**२) संयुक्त कुटूंब :**

हा कुटुंबाचा दूसरा प्रकार आहे यांत सदस्य संख्या अधिक प्रमाणात असते. यांत तीन पिढ्यांपर्यंतचे कुटूंबीय एकत्र राहतात. यात रक्तसंबंधी व्यक्तींचाही समावेश होतो.

कुटुंबाला भारतीय संस्कृतीत समाज जीवनाची पाठशाला म्हटले जाते. समाजामध्ये कसे जगावे, कसे वागावे याचे शिक्षण कुटुंबात आई-वडील व इतर मोठ्या माणसांकडून नकळत मिळत असते. कुटुंबाच्या या संस्काराचा लहानपणापासूनच प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडत असतो. पारंपरिक रूढी, संस्कार समाजमान्य होऊन आपण टिकवून ठेवत असतो. कुटुंबातून आपला मानसिक, शारीरिक, भावनिक, बौद्धिक विकास होतो. कुटुंबातून सहकार्य, प्रेम, माया, विश्वास, सहानुभूती, आदर, नैतिकता



या मूल्यांचा विकास होत जातो. विविध कौटूंबिक अनुभवांतून आपण जीवन जगण्याची शैली आत्मसात करतो. समाजामध्ये वारसाहक्काने आई-बापाचा सांभाळ करावा, मुलीचे लग्न करून तिची पाठवणी करावी व तिचे भावाने संरक्षण करावे. कुटुंबातूनच नाते एकमेकात गुंतत जातात. मुलगाच वंशाचा कुलदीपक आहे. त्यांच्याशिवाय घराला शोभा नाही अशा प्रकारचे विचार प्रवाह कौटुंबिक जीवनातूनच निर्माण झाले आहेत. काही आदिवासी जमातीत पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना मानाचे स्थान नसले तरीही त्यांची अवस्था दयनीय होती. पुरुषी वर्चस्वाच्या खाली स्त्रिया जीवन व्यतीत करताना दिसून येतात. यावेळी त्यांच्या मनात निर्माण झालेल्या भावना विविध माध्यमातून अभिव्यक्त होतात.

विविध ओव्या, गीते, कथा, संवाद, नाटके यांतून देखील कौटुंबिक जीवनाचे वर्णन समोर येते. विशेष रूपाने स्त्रिया या माहेर आणि सासर अशा दोन्ही कुटुंबांची उद्धारणा करतात दैनंदिन काम करतात. जीवनातील विविध अनुभव त्यांच्या मुखावर येतात. स्त्रियांना माहेर आणि सासर दोन्हीकडे परंपरागत रूढीप्रिय जीवन जगावे लागते.

# महाराष्ट्रातील राजकारणाची आगामी वाटचाल



हर्षवर्धन घाटे
मो. ९८२३१४६६४८

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन राजकीय पक्षांनी आतापासूनच जोरदार मोर्चेबांधणी सुरूकेलेलीआहे. शिवसेनेच्या सत्तासंघर्षावरील सर्वाच्च न्यायालयाचा निकाल साधारणतः मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात येण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात असताना हा निकाल नेमका कोणाच्या बाजुने लागेल याचे वेगवेगळे तर्क लढवले जात आहेत.कायदेतज्ञामध्ये एकनाथ शिंदे सोबत जे सुरूवातीला आमदार आधी सुरत मग गुवाहटी ला गेले त्यांच्यावर अपात्रतेची कार्यवाही होऊ शकते याबाबत एकमत आहे .तसे झाल्यास राज्यातील सत्ताधारी पक्ष अल्पमतात येऊन सरकारच्या भवितव्यावर गदा येऊ शकते.**

त्यामुळे हे सरकार वाचवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील एक गट अजित पवारांच्या नेतृत्वाखाली बाहेर पडून पहाटेच्या शपथविधीचा राहिलेला सोपस्कार पूर्ण करेल आणि अनेक वर्षापासुन मुख्यमंत्री होण्याची अजित पवार यांची मनिषा पूर्ण होईल असे भाकीत केले जात आहे.यात काहीअंशी तथ्य असले तरी तशी शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. शिवसेना कधी काँग्रेस राष्ट्रवादी यासारख्या पुरोगामी पक्षाशी युती करेल अशी शक्यताही नसताना महाराष्ट्रात महाविकास आघाडीची ज्या पद्धतीने निर्मिती झाली आणि या आघाडीने जवळपास अडीच वर्षे आपला कारभार अतिशय योग्य पद्धतीने सांभाळला हे लक्षात घेता राष्ट्रवादी आणि भाजप एकत्र येऊन शकतील ही शक्यताही नाकारता येत नाही. यामागे दोन कारणे आपल्याला स्पष्टपणे दिसतात एक राष्ट्रवादी पक्षाला महाराष्ट्रामध्ये सत्तेमध्ये राहण्यास नेहमी रस राहिलेला आहे महाविकास आघाडीची सत्ता गेल्यानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये जे अस्वस्थता आहे ती आता लपून राहिलेली नाही. इकडे उद्धव ठाकरे महाराष्ट्रभर महाविकास आघाडीच्या नावाने वज्रमूठ सभा घेत आहे या सभांना प्रचंड गर्दी होताना आपण पाहतो आहे .कोरोनाच्या काळामध्ये ज्या पद्धतीने उद्धव ठाकरेंनी महाराष्ट्रामध्ये आरोग्य व्यवस्था हाताळली आणि एकूणच राज्यकारभारामध्ये जी पारदर्शकता आणि आपला काळजी घेणारा एक कुटुंबप्रमुख या नात्याने मुख्यमंत्री पदाची जी प्रतिमा निर्माण केली ती प्रतिमा आजही सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये कायम आहे . एकनाथ शिंदे हे भाजपशी जाऊन मिळाले यात गैर नसले तरी एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंची घोर फसवणूक केली हा विचार सामान्य शिवसैनिकांच्या मनामध्ये आजही कायम आहे आणि तो विचार आणि उद्धव ठाकरेंनी आगामी काळामध्ये घेतलेली भूमिका यांचा एकत्रित विचार करता महाविकास आघाडीला येणाऱ्या निवडणुकांमध्ये प्रचंड यश मिळेल यात शंका नाही. हे यश पूर्णपणे उद्धव ठाकरे यांचे असेल आणि या यशामध्ये त्यांचा वाटा लक्षात घेता त्यांनाच मुख्यमंत्री पदाचा उमेदवार म्हणून महाविकास आघाडीने घोषित केल्यास आपले राजकीय अस्तित्व काही अंशी का होईना कमी होईल अशी भीती काही अंशी राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये बघायला मिळते आहे आणि त्या भूमिकेतूनच हे नेते आपल्या पक्षांचा महाविकास आघाडीतील राजकीय दबाव वाढवण्यासाठी आणि शरद पवारांचे त्यावरील नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी म्हणून नवनवीन मुलाखतीतून आम्ही कुठल्याही परिस्थितीमध्ये राजकीय बाबतीत निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र आहोत कदाचित भविष्यात आम्ही महाविकास आघाडीतून बाहेरही पडू अशी भूमिका त्यांनी जाहीरपणे घेतली नसली तरी त्यांचा एकूणच कल पाहता एकीकडे आपले महाविकास आघाडीतील प्रस्थ वाढवायचे तर दुसरीकडे भाजप सारख्या पक्षाशी सख्य ठेवून राहायचे अशी दुहेरी भूमिका राष्ट्रवादीचे नेते घेताना दिसत आहेत .यातून दोन बाबी स्पष्ट होताना दिसतात सर्वाधिक भ्रष्टाचाराचे गुन्हे हे राष्ट्रवादीच्या नेत्यांवर असल्यामुळे त्यातून सुटका करून घेण्यासाठी म्हणून का होईना हे सर्व नेते भाजपशी सख्य राखून आपले राजकीय अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसून येत आहेत .एकूणच राष्ट्रवादीचा अलीकडच्या कार्यकाळातला प्रभाव पाहता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुठल्याही परिस्थितीमध्ये कुठलेही निर्णय घेऊ शकतो हे आता उघड होत आहे .शरद पवार एकीकडे दिल्लीमध्ये राहुल गांधींची भेट घेतात तर दुसरीकडे आपले मित्र म्हणून अदानीचेही समर्थन करतात ही बाब आता लपून राहिलेली नाही.तेव्हा महाराष्ट्रातल्या राजकारणात कायमच शरद पवार हे एक प्रकारचे दबाव तंत्र वापरून राजकारण पुढे नेणारे नेते म्हणून राजकीय पटलावर वावरलेले आहेत. शरद पवार स्वतःला पुरोगामी म्हणून घेत असले तरी एकेकाळी जनसंघासारख्या पक्षांबरोबर पुरंदरचे सरकार स्थापन करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे तेव्हा येणाऱ्या काळामध्ये राष्ट्रवादी पक्षाची भूमिका ही महाविकास आघाडीच्या राजकीय यशामध्ये महत्त्वाची ठरणार आहे. महाराष्ट्रातील सद्य परिस्थिती पाहता आगामी काळात शरद पवार काय भूमिका घेतात यावरच पुढच्या राजकीय गोष्टी बऱ्यांशी अवलंबून आहेत. उद्धव ठाकरे वज्रमुठ सभांमधून महाविकास आघाडीची भूमिका जरी मांडत असले तरी त्यांच्या भूमिकेशी विसंगत परस्पर विरोधी भूमिका राष्ट्रवादीचे नेते मांडताना दिसत आहेत. विशेषतः शरद पवार व अजित पवारांच्या अलीकडच्या मुलाखती आपण पाहिल्या तर त्यातून त्यांचा रोख हा दोन्ही बाजूने आपला पक्ष कसा वाढेल यावरच दिसतो आहे. महाराष्ट्रातल्या राजकारणापासून सुप्रिया सुळे या कायमच अंतर ठेवून राहिलेल्या आहेत.त्यामुळे अजित पवारांचे आगामी काळातील पाऊल हे महाराष्ट्रातल्या राजकारणामध्ये एक नवे वळण निर्माण करेल अशी शक्यता आहे. भारतीय जनता पक्ष आणि एकनाथ शिंदे यांनी एकत्र येऊन स्थापन झालेल्या सरकारला आता जवळपास दहा महिन्याहून अधिक काळ लोटला आहे .या काळामध्ये दिल्लीतील भाजपा नेत्यांचे महाराष्ट्रातल्या घडामोडींवर बारकाईने लक्ष आहे. काहीही करून उद्धव ठाकरेंना धडा शिकवायचा त्यासाठी संभाव्य सगळे प्रयत्न करायचे अशी एक अढ मनात घेऊन भारतीय जनता पक्ष आणि शिंदे गट महाराष्ट्र मध्ये काम करतो आहे. उद्धव ठाकरेंच्या सभांना तोडीस तोड सभा शिंदे गटाकडून घेतल्या जात आहे आणि त्याला भाजपाचे समर्थन आहे हेही आता लपून राहिलेले नाही .अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्रामध्ये आगामी राजकीय परिस्थिती काय असू शकते याचा या लेखांमध्ये मागोवा घेणे त्यामुळेच क्रमप्राप्त ठरते. महाराष्ट्र ही कायमच पुरोगामी, लोकशाही परंपरा मानणारे राज्य म्हणून देशभर ओळखले जाते याच महाराष्ट्रामध्ये संतांची ,समाज सुधारण्यांची आणि राजकीय नेतृत्वाची मोठी फळी निर्माण झालेली आहे. त्यामध्ये बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक ,विनायक दामोदर सावरकर ते अलीकडच्या काळातील यशवंतराव चव्हाणांपासून पासून शरद पवारांपर्यंत देशाच्या राजकारणामध्ये महाराष्ट्राने कायमच आपले एक वेगळे स्थान निर्माण केलेले आहे .अशा स्थितीमध्ये 2024 च्या लोकसभा निवडणुकीनंतर भारतीय जनता पक्षाला यश मिळेल किंवा नाही हे महाराष्ट्रासारख्या राज्यातून निर्माण होणाऱ्या लोकमातवर ठरणार असल्याने महाराष्ट्रावरले भारतीय जनता पक्षाचे लक्ष हे त्यामुळेच अधिक आहे .भारतीय जनता पक्षाला कडवा विरोध करणारा शिवसेनेसारखा प्रादेशिक पक्ष या राज्यात असल्याने आणि या पक्षाने देशभरातली भाजप विरोधी पक्षांची मुठ बांधण्यात महत्त्वाची भूमिका निभावत असल्याने शिवसेनेला काहीही करून संपवायचे असा एक सर्वसाधारण प्रयत्न भारतीय जनता पक्षाचा आगामी काळात राहणार आहे .त्यासाठी मुंबई महानगरपालिकेची निवडणुक त्याची रंगीत तालीम असेल. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचा पराभव केल्यास आपल्याला महाराष्ट्रामध्ये शिवसेनेच्या विस्तारावर काही अंशी का होईना पायबंद घालता येईल अशी अडगळ भारतीय जनता पक्ष बांधून आहे .आणि हे खरे आहे की शिवसेना हा पक्ष वाढला तो प्रामुख्याने मुंबई आणि ठाण्यासारख्या भागात मराठी माणूस त्यांची अस्मिता आणि त्यांचे प्रश्न घेऊन शिवसेना कायमच प्रादेशिक पक्षाच्या चौकटीत काम करत आलेली आहे आणि तिने घेतलेली भूमिका ही महाराष्ट्राच्या सत्ता संघर्षामध्ये महत्त्वाची राहिलेली आहे .त्यामुळे पहिल्यांदा महाराष्ट्रात शिवसेनेला हिंदुत्वाचा जो एक चेहरा आहे तो घालूवून आपण महाराष्ट्रामध्ये शिवसेनेचा पराभव केल्यास तोच कल संबंध देशांमध्ये आपल्याला निर्माण करून पुन्हा एकदा 2024 मध्ये सत्तेत जाता येईल असे भारतीय जनता पक्षाला वाटते आहे. महाराष्ट्रात सद्यस्थिती लक्षात घेता तरुणांचे प्रश्न हे ऐरणीवर येताना दिसत आहेत. राज्याच्या लोकसंख्येमध्ये तरुणांच्या वाटा मोठा आहे हे तरुण गेली दहा वर्षापासून रोजगाराच्या शोधामध्ये पुणे, मुंबई सारख्या शहरांमध्ये राहून रात्रंदिवस अभ्यास करत आहेत.आपले भवितव्य हे शासकीय सेवेत सुरक्षित असल्याचा एक भ्रम या तरुण मंडळीत असल्याने स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या मुलांची संख्या महाराष्ट्रामध्ये प्रचंड वाढलेली आहे. या मोठ्या कार्यकारी गटाला रोजगार देण्यामध्ये राज्य सरकारांना सपशेल अपयश येत असल्याकारणाने या तरुणांना विधायक वळण देऊन त्यांचा वापर देश हितामध्ये करता येईल का ? या दृष्टीने आजघडीला कुठलाही राजकीय पक्ष गांभीर्याने विचार करताना दिसून येत नाही .दुसरीकडे शेतकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर आलेले आहेत. हवामान बदलाच्या मोठा परिणाम महाराष्ट्रातल्या शेतीवर झालेला आहे. पावसाचे असंतुलित आणि असमान वितरण ,प्रादेशिक असमतोल ,नैसर्गिक असमतोल ,वाढत जाणारी महागाई आणि शेतीला स्थिरता नसल्याकारणाने अनेक शेतकरी दररोज आत्महत्या करत आहेत. महाराष्ट्रामध्ये शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणामध्ये वाढत आहे असे असताना उद्योगाच्या बाबतीतही महाराष्ट्रामध्ये शिंदे फडणवीस सरकारच्या कार्यकाळामध्ये अधोगती पाहायला मिळते आहे. महाराष्ट्रातून मोठे उद्योग हे गुजरातमध्ये स्थलांतरित झाल्यामुळे येथील तरुणांना मिळणारा रोजगार हा बुडाला आहे परिणामी उद्योगधंदे नाहीत, नोकरी नाही , राबत्या हाताला काम नाही,

शेतीला स्थैर्य नाही अशा स्थितीतला राज्यातला तरुण वर्ग हा मोठ्या प्रमाणामध्ये राजकीय बाबतीमध्ये उदासीन दिसतो आहे .राज्यांमधल्या राजकारणाकडे आपण डोळसपणे पाहिल्यास एकूणच कुठल्याही राजकीय पक्षाची भूमिका ही सर्व समावेशक ,लोक हिताची दिसून येत नाही. प्रत्येक पक्ष हा एका विशिष्ट जातीमध्ये बंदिस्त झाल्याकारणाने जाती बाहेर येऊन सर्वसामान्यांचे प्रश्न ऐरणीवर लावेल आणि ते तडीस नेईल अशी एक शक्यता दिसून येत नाही. प्रत्येक पक्ष आपले राजकीय अस्तित्व तयार करण्यासाठी जातीचा आधार घेतो आहे आणि महाराष्ट्रातल्या राजकारणामध्ये जात ही अलीकडच्या काळामध्ये कळीची भूमिका निभावताना दिसून येत आहे .जातीचे राजकारण हे महाराष्ट्रासाठी कायमच कलाटणी देणारे राहिलेले आहे. एकेकाळी स्वतःला समाजवादी म्हणून घेणारेही जातीच्या जातीच्या चौकटीतून बाहेर आलेले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्रातले राजकारण हे धर्मनिरपेक्ष तिकडे वाटचाल करण्याऐवजी दिवसेंदिवस कडवट धार्मिकते कडे झुकते आहे. आणि हे राज्याला कदापि पोषक नाही. राज्यातला तरुण हा जातीमध्ये बंदिस्त होत असल्याकारणाने देश पातळीवर महाराष्ट्राने जे नवे पायंडे रचायला पाहिजेत ते तसे होताना दिसत नाही. एकीकडे वंचित बहुजन आघाडी आणि त्या माध्यमातून प्रकाश आंबेडकर हे वंचित समूहाच्या राजकीय आकांक्षांना महाराष्ट्राच्या परीपेक्षा मध्ये स्थान निर्माण करण्यासाठी म्हणून प्रयत्न करत असले तरी त्यांच्या पक्षाला स्थानिक पातळीवर जाऊन संघटन बांधणी करणे अद्यापही शक्य झाले नसल्यामुळे आणि वंचितांचे संघटन करणे हे त्यातील प्रत्येक जात स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजत असल्याने कायमच अशक्यप्राय असल्याचे आजपर्यंतच्या त्यांच्या राजकीय वाटचालीवरून दिसून येत आहे .राहिला प्रश्न काँग्रेस राष्ट्रवादीचा त्यांनी तर आपापल्या पद्धतीने आपला पक्ष कसा वाढेल हे प्रयत्न करत असतात परंतु त्यांचे नेते हे सर्वसामान्य लोकांपासून ,त्यांच्या प्रश्नापासून दुरावलेले असल्यामुळे त्यांच्यामध्ये आणि सर्वसामान्य जनतेमध्ये एक दरी निर्माण झालेली आहे. प्रत्येक जिल्ह्यात त्यांचा एक नेता आणि त्या नेत्याकरवी त्या जिल्ह्यातील संघटन अशा सरंजामशाही पद्धतीने हे पक्ष आपली राजकीय वाटचाल करीत असल्यामुळे या पक्षांना आपला विस्तार करणे कठीण जाताना दिसून येत आहे. दुसरीकडे एमआयएम सारखे पक्षही महाराष्ट्राच्या मोजक्या शहरांपुरते मर्यादित होताना दिसून येतात याचे कारण मुस्लिम समाजाची लोकसंख्या, त्यांच्यातील अल्पशिक्षितपणा, राजकीय प्रगल्भतेचा अभाव, भीषण गरीबी आणि राजकीय पक्षांमध्ये विभागली गेलेली त्यांची नेतृत्वाची फळी यामुळे या समाजाला महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये स्वतःचे स्थान निर्माण करता आलेले नाही. मनसेसारख्या पक्षाची दरवेळी नव नवी भूमिका आणि सत्तेचे प्रादेशिक विभाजन यामुळे या पक्षाला ऊर्जितावस्था आलेली आहे. कुठलाही प्रश्न मनसेला तडीस नेताना जे संघटन कौशल्य लागते त्याचा अभाव यामुळे या पक्षाला राजकीय यश मिळवता आलेले नाही. त्यातच नव्यानेअलीकडच्या काळात महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागांमध्ये तेलंगणाच्या विकासाच्या स्वप्नांची भुरळ घालून भारत राष्ट्र समिती सारख्या पक्षाने आपला जम बसवायला सुरुवात केलेली आहे .के सी आर हे महाराष्ट्रातील जनतेला तेलंगणाच्या धर्तीवर विकासाच्या वेगळ्या उंचीवर नेण्याचे चे स्वप्न दाखवत आहेत त्याला महाराष्ट्रातील जनता विशेषतः मराठवाड्यातील जनता कितपत दाद देते हे निवडणुकानंतरच लक्षात येणार आहे .याचे कारण या पक्षांमध्ये जी नेतेमंडळी नव्याने दाखल झाली आहे ती पूर्वापार काँग्रेस ,राष्ट्रवादी ,भाजप यासारख्या पक्षांमध्ये आपले स्थान निर्माण न करता आल्याने त्यांनी भारत राष्ट्र समितीचा झेंडा आपल्या खांद्यावर घेतलेला आहे तेव्हा अशा नेतृत्व म्हणून पुढे येणाऱ्या फळीने या पक्षाची धुरा हाती घेऊन महाराष्ट्रातली राजकारण कितपत पुढे नेतील हे आत्ताच सांगणे कठीण होईल. अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्रात नेमके काय होऊ शकते याचाही मागवा या निमित्ताने घेणे आपल्याला महत्त्वाचे ठरते. महाविकास आघाडीला आपली एकसंधता आणि नेतृत्वाची कमान राखण्यात यश आल्यास महाविकास आघाडीला महाराष्ट्रात चांगले यश मिळू शकते परंतु तशी एकता महाविकास आघाडीमध्ये टिकून राहील अशी शक्यता दुरापास्त आहे .याचे कारण काँग्रेस आणि त्यांची नेते मंडळी ही कायमच शिवसेनेपासून विशेषत उद्धव ठाकरेंपासून थोडीशी आंतरराखून राहताना दिसून येत आहे. राष्ट्रवादीमध्ये थोड्या बहुत प्रमाणात तशीच परिस्थिती आहे. राहिला प्रश्न उद्धव ठाकरे गटाचा ते प्रामाणिक प्रयत्न केले तरी त्यांना मोठे आव्हान या निवडणुकांमध्ये मिळणार आहे .ते पेलून सत्तेत येणे हे ठाकरे गटाला थोडेसे कठीण जाणार. जसजशा निवडणुका जवळ येतील तसतसे भारतीय जनता पक्ष आणि शिंदे गटाचा प्रचार जोर धरेल आणि सर्व प्रकारची यंत्रणा वापरून हे पक्ष ठाकरे गटाला शह देण्याचा प्रयत्न करतील. आणि ते गेल्या काही पोटनिवडणुकीत पहायला मिळाले आहे. अशा स्थितीमध्ये महाराष्ट्रामध्ये कुठल्याही एका पक्षाला बहुमत मिळेल अशी शक्यता नाही. भारतीय जनता पक्षाला अलीकडच्या काळामध्ये महाराष्ट्रात प्रतिसाद मिळत असला तरी महाराष्ट्राच्या प्रादेशिक विभागवर राजकीय विचार करता विदर्भ ,कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राचा काही भाग वगळता इतरत्र भारतीय जनता पक्षाला मोठे यश मिळेल अशी शक्यता नाही . देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्यातील नेतृत्व हे जाणीवपूर्वक रुजू न दिल्याने मराठवाड्यातील सत्ता कमान सांभाळेल असा एकही नेता या स्थितीत भाजपाकडे नाही .पंकजा मुंडे ,रावसाहेब दानवे यासारखी नेतेमंडळीही आपापला गड राखण्यात यशस्वी होतील की नाही अशी शक्यता मराठवाड्यात आहे. मराठवाडा हा कायमच काँग्रेस आणि समविचारी पक्षांचा बालेकिल्ला राहिल्याने तसेच काँग्रेसच्या पहिल्या फळीतील नेतेमंडळी ही याच भागात निर्माण झालेली असल्याने मराठवाड्यामध्ये शिंदे भाजप गटाला फारसे यश मिळणार नाही. विदर्भामध्ये काँग्रेस आणि भाजप यामध्येच प्रामुख्याने संघर्ष पाहायला मिळतो. शिवसेना आणि राष्ट्रवादी हे कायमच विदर्भामध्ये सत्ता विस्तार करण्यामध्ये अपयशी ठरलेले आहेत. राहिला प्रश्न पश्चिम महाराष्ट्राचा पश्चिम महाराष्ट्र हा कायमच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा गड राहिलेला आहे .अलीकडच्या काळात या भागांमध्ये भाजपाचे वर्चस्व वाढले असले तरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या भागामध्ये आपले संघटन वाढवून राजकीय यश प्राप्त करेल अशी शक्यता दिसते आहे. कोकणामध्ये शिंदे गट ठाकरे गट यांच्यामध्येच प्रामुख्याने लढत पाहायला मिळेल .त्यामुळे मुंबई ,पुणे ,नाशिक, औरंगाबाद यांसारखी मोठी शहरे वगळता अन्यत्र भाजप आणि शिंदे गटाला पोषक स्थिती सद्यस्थितीत दिसून येत नाही. तेव्हा महाराष्ट्रातल्या कुठल्याही एका राजकीय पक्षाला एक हाती यश मिळेल अशी शक्यता नाही .अशा स्थितीमध्ये महाराष्ट्रातली सर्व पक्ष आपापली ताकद पणाला लावून निवडणुका लढवतील आणि त्यामध्ये आलेल्या यशानंतर दोन पेक्षा अधिक पक्ष एकत्रित येऊन सरकार स्थापन करतील अशीच आजची राजकीय परिस्थिती दिसते आहे .राजकारणामध्ये कुठलाही एक पक्ष हा कायम शत्रू नसतो किंवा मित्रही नसतो., त्यामुळे महाविकास आघाडीतून काही पक्ष भाजपाच्या गोटात दाखल होतील तर काही पक्ष भाजपच्या गोटातून अन्य पक्षाच्या गोठा मध्ये दाखल होतील आणि हे महाराष्ट्रातल्या सत्ता संघर्षामध्ये एक नवा अध्याय घडवेल अशी शक्यता निवडणूक निकालानंतर निर्माण होऊ शकते .त्याचबरोबर महाराष्ट्रामध्ये छोट्या पक्षांचाही प्रभाव आपल्याला पाहायला मिळतो. गिरणी कामगारांची ,कष्टकऱ्यांची चळवळ आता जागतिकीकरणानंतर कुठेतरी आपला जम बसवताना दिसून येत आहे. त्याचबरोबर राजू शेट्टी , सदाभाऊ खोतांसारखे भाजपापासून दुरावलेले कार्यकर्ते महाराष्ट्रातल्या सत्ता संघर्षामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतील आणि महाराष्ट्रातल्या राजकारणाला एक वेगळा आयाम देतील अशी शक्यता नाकारता येत नाही .तेव्हा येणाऱ्या काळात महाराष्ट्रातले राजकारण हे अधिकाधिक संघर्षाकडे आणि राजकीय अस्तित्व पणाला लावून आपला संघर्ष व्यापक पटलावर मांडण्याचा प्रयत्न करतील. त्यातून महाराष्ट्राचे राजकारण हे अधिक सर्व समावेशक व लोकाभिमुख होईल . त्यातून महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांना विवेकी राजकारणाची दिशा मिळेल अशी अपेक्षा करायला हरकत नाही. **(लेखक सामाजीक राजकीय प्रश्नांचे अभ्यासक व विश्लेषक आहेत)**

# आदर्शच दिशाहीन असेल तर योग्य दिशा कशी सापडेल ?



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आजकाल आदर्श म्हणजे क्षणात बदलण्याचं ठिकाण झालं आहे. आपला आदर्श कोण किती व कसे हे फार खात्रीने कोणीही सांगू शकणार नाही. कारण आदर्शाची कल्पना वेळेनुसार बदलतं आहे. आदर्श म्हणजे क्षणिक आवड झाली आहे. आपण ज्यांना आदर्श मानतो त्यांना तरी आचरण करताना भान आहे का कि आपल्याला पाहुण अनेक लोक आचरण करतात मग आपण किती काळजी पुर्वक दक्षता घेऊन जबाबदारी ने वागल पाहिजे. पण ज्याला आदर्श समजतो तो त्याच आचरण सार्वजनिक पातळीवर अगदी लहान मुलांसारख आहे. आपणं कोणासाठी तरी आदर्श आहोत याचा विसर पडतो अशा पद्धतीने सेलेब्रिटी वागतात.**

आधुनिक केसरी

आपण त्यांना आपला आदर्श समजतो तेच व्यक्तिमत्व जर दिशा हिन असेल तर आपण योग्य ठिकाणी कसे पोहचणार. आदर्श म्हणजे आरसा ज्या मध्ये भेद लपत नाही अथवा लपवता येत नाही. आपला आदर्श हा आरशा सारखा स्वच्छ भेदरहित सर्व गुणसंपन्न,अवगुण विरहित, सत्यनिष्ठ,शांत संयमी, स्थिर, विवेक शील वैचारिक परिपक्व व निर्व्यसनी असेल तर निश्चितच आपलं कल्याण होईल. या मध्ये शंका नाही पण आपलं आदर्श स्थान निवडताना काही गडबड झाली तर मग त्याचे विपरीत परिणाम देखील आपल्याला मोजावे लागतील. आपल्या जडणघडणीच आदर्शस्थान जर दिशा हिन असेल तर आपण योग्य कसे घडणार हाच मुळात गहण विषय आहे. जीवनात प्रत्येक व्यक्ती आपला आदर्श म्हणून कोणाला तरी पाहुण स्वतःच आयुष्य त्या पद्धतीने घडवित असतो. आपली जडणघडण होत असताना आपल आदर्शस्थान योग्य असेल तर मग आयुष्याच्या शेवटी आपल्याला फार चिंता करण्याची आवश्यकता नाही. पण आपलं गणित फसलं आणि आदर्श चुकला तर मग आपली फजिती झाली म्हणून समजा, आपलं आयुष्य एवढ सर्वसाधारण आहे का कि आपण कोणाताही विचार न करता कोणालाही आदर्श समजावं आपण ज्याला आदर्श समजावं त्यांचं कार्य महती गुण अवगुण आपण जाणतो का या पैकी काय पाहुण आपण आदर्श निवडतो. आपला आदर्श कोण आणि का याच काही तरी मुल्यमापन आपल्याकडं आहे का मला उगाच कोणीतरी सिनेतारक आवडतो कोणी तरी क्रिकेटपटु आवडतो अथवा एखाद्या राजनेता तत्सम या पैकी कोणी ना कोणी तरी आपल्याला उगाच आवडतो आवडीच कारण गुलदस्त्यात असतं. म्हणजे आपली आवड का अथवा आपण आपला आदर्श त्यांना का मानतो याच काहिच गांभिर्य आपल्याला नसतं. आपला आदर्श तंबाखू पासुन सर्व प्रकारच्या मद्याची जाहिरात करतो आणि भाषा तर विचारू नका. मग आपला आदर्श असणारा तारक एवढा उत्कृष्ट असेल तर आपण किती उत्कृष्ट घडणार आपणं ज्यांच अनुकरण करत मार्गक्रमण करतो अथवा ज्यांना आपला तथाकथित मार्गदर्शक समजतो ते व्यक्तिमत्व खरंच आदर्श आहे का ते व्यक्तिमत्व खरच आदर्श असेल तर आपली दिशा योग्य आहे. या मध्ये कुठेही शंका नाही अडचण नाही पण आपणं ज्यांना आदर्श समजतो मानतो तेच दिशाहिन असतील तर आपल्याला कोणती दिशा मिळेल याच चिंतन आपण कधी करतो का आदर्श हा दुरदृष्टी, संयमित, सत्यनिष्ठ, न्यायप्रिय,नितिवान असला पाहिजे. मुळात आदर्श स्थान आपण जे निवडलं अथवा स्वीकारलं तिथेच गडबड आहे. आपण ज्यांना आदर्श समजतो ते जगाच्या सोडा स्वतःच्या नजरेत तरी आदर्श आहेत का याचा विचार आपण कधी तरी केला पाहिजे आणि आपलं आयुष्य गडबड होणार नाही असा आपला आदर्श असला पाहिजे.



# वीज महावितरणाविरुद्ध रास्ता रोको आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात बदलत्या तापमानामुळे अनेक ठिकाणी पावसाचा जोर बघायला मिळत आहे व काही ठिकाणी वादळी वारा असल्यामुळे झाडांच्या फांद्या विजेच्या तारांवर पडल्याने वीज खंडित होत आहे. या प्रकारामुळे वीज महावितरण याकडे दुर्लक्ष करून वारंवार वीज खंडित होण्याचा प्रकार घडत आहे असे ठाकरे गट शिवसेनेचा आरोप आहे. वारंवार वीज बंद होणाऱ्या सामान्य नागरिकांना त्रास यासाठी शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी महावितरण कार्यालयाच्या समोर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्या ठिकाणी मोठ्या वाहतुकीची कोंडी निर्माण झाली काही वेळ नागरिकांना त्रास ही सहन करावा लागला. वाहतूक शाखेने वाहतूक सुरळीत केली.



## संत निरंकारी मंडळाच्या रक्तदान शिबिरात 415 रक्तदात्यांचे उस्फूर्त रक्तदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मानवतेचे मसीहा बाबा गुरबचनसिंहजी यांच्या पावन स्मृतिप्रित्यर्थ दिनांक 24 एप्रिल हा दिवस संपूर्ण निरंकारी जगतात देश विदेशामध्ये रक्तदान शिबिरांचे आयोजन करत 'मानव एकता दिवस' या रूपात साजरा केला जातो. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मानव कल्याणार्थ संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . या वेळी 415 रक्तदात्यांनी उस्फूर्तपणे रक्तदान करून मानवतेचे अनुपम दर्शन घडविले. शिबिराचे उद्घाटन सर्वांस विदितच आहे, की युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी यांनी सत्याचा बोध प्रदान करत समाजात व्याप्त अनिष्ट गोष्टीच्या त्या कालखंडानंतर बाबा हरदेवसिंहजी यांच्या रक्त धमण्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नको' या प्रेरक संदेशातून समस्त निरंकारी भक्तांना एक नवी सकारात्मक दिशा मिळाली. तोच प्रेरक संदेश जीवनात उतरवत निरंकारी भक्त लोककल्याणार्थ आपल्या सेवा प्रदान करत आले आहेत. हे रक्तदान महाअभियान भारतातील संत निरंकारी मिशनच्या सर्व 99 झोन मधील बहुसंख्य शाखांमध्ये राबविले गेले. शिबिराचे उद्घाटन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ संजय राठोड यांनी केले या वेळी मंडळाचे पूर्व विभागीय प्रमुख कन्हैयालाल डेब्रा, सेवादल क्षेत्रीय संचालक विजय बोडखे, सिडको शाखेचे मुखी डी जी दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती, शिबिराच्या यशस्वीतेसाठी सेवादल सदस्यांनी विशेष परीश्रम घेतले.

## शासकीय विभागीय ग्रंथालयात बालकुमार ज्ञान कोपराचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आधुनिक युगात लोक मोबाईल व सोशल मीडियाच्या आहारी - जाऊन ग्रंथ वाचनापासून दूर जाऊ लागले असले तरी ग्रंथ वाचनाचे संस्कार दीर्घकालीन टिकणारे असून समाजाला घडविणाऱ्या ग्रंथांचे महत्त्व सर्वकालीन अबाधित राहणार असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड यांनी केले. शासकीय विभागीय ग्रंथालयातील बालकुमार ज्ञान कोपरा उद्घाटन, ग्रंथ प्रदर्शन व विक्री कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.
जागतिक ग्रंथ दिनानिमित्त सहाय्यक ग्रंथालय संचालक - कार्यालय, शासकीय विभागीय ग्रंथालय तथा जिल्हा ग्रंथालय - अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त : विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मसापचे कोषाध्यक्ष कुंडलिक अतकरे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, ज्येष्ठ पत्रकार अण्णा वैद्य, जालना ग्रंथालय असोसिएशनचे अध्यक्ष डी.बी. देशपांडे, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये मुलांना मोबाईलपासून दूर ठेवून त्यांना ग्रंथ वाचण्याची गोडी लावून वाचन संस्कृती वाढविण्यासाठी बालकुमार ज्ञान कोपरा शासकीय विभागीय ग्रंथालयामध्ये सुरू करण्यात येत असल्याचे आपल्या प्रास्ताविकातून सुनील हुसे यांनी सांगितले. जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत यांनी वाचनाचे कितीही आधुनिक पर्याय उपलब्ध असले तरी प्रत्यक्ष ग्रंथ हातात घेऊन वाचनाचा आनंद अवर्णनीय असल्याचे सांगितले.




## वलखेड फाटा व शिक्षक अपघात नेमके गूढ काय?

### आतापर्यंत वलखेड फाट्यावर पाच शिक्षकांचा मृत्यू व तीन शिक्षक गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**
**दिंडोरी :** तालुक्यात आजही काही ठिकाणे अपघाताचे माहेर घर म्हणून ओळखले जात आहे. त्यात वणी -सापुतरा रस्ता, लखमापुर फाटा, अवनखेड पुल,वलखेड फाटा, अक्राळे फाटा, खतवड फाटा इ.ठिकाणे प्रवासी वर्गाला,व वाहनधारकांना नेहमी अपघाताचे निमंत्रणाचे ठिकाणे बनले असुन अनेक जणांना या ठिकाणी आपला प्राण गमवावा लागला आहे. तर काहीनां कायम स्वरूपी अंपगत्व आले आहे. नेमके अपघाताचे गुढ काय ? यामुळे एकप्रकारे गुंतागुंतीचे समीकरण होऊन बसले आहेत.

आजही तो दिवस अटवितो तो म्हणजे २६ जुलै २०२१ सहा शिक्षक आपले शालेय कामकाज आटोपून नाशिककडे जातांना वलखेड फाट्याजवळील जीर्ण झालेले झाड चार चाकी गाडीवर कोसळून गाडीतील तीन शिक्षकांचा जागीच मुत्यू झाला होता तर तीन ते चार शिक्षक गंभीर जखमी झाले होते. हा अपघात आता मनापासून दुर जातांना दि.२४ एप्रिल २०२३ रोजी वणी येथील अत्यंत मनमिळाऊ असणारे शिक्षक प्राध्यापक रामदास शिंदे रा.रवळस ता.निफाड यांचा तिहेरी अपघातात वलखेड फाट्यावर अपघात होऊन त्यांचा जागीच मुत्यू झाला. त्यामुळे वलखेड फाटा व शिक्षक अपघात हे समीकरण विविध चर्चेत गुंफले जाऊ लागले आहे. शिंदे यांचा दि.२५ एप्रिल २०२३ रोजी सेवानिवृत्तीचा कार्यक्रम होणार होता. परंतु काळाने शिंदे सरांवर अचानक घाला घातल्याने शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्या वर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. याठिकाणी अपघात का होतात हा विषय सध्या प्रत्येकांच्या मनातील विषय होऊन बसला आहे. याला काही महत्त्वाच्या गोष्टींचा अभाव याठिकाणी पाहायला मिळत आहे. तो अभाव जर काटेकोरपणे दुर केला तर अपघातांपासुन वाहनधारकांची सुटका होईल असे सुर सध्या निघत आहे. तेव्हा संबंधित विभागाने यांचे गंभीर पुर्वक परिक्षण करून या ठिकाणच्या अडचणी दुर कराव्यात. अशी मागणी सध्या जोर धरीत आहे.



**वलखेड फाटा समस्येच्या विळख्यात :** वलखेड फाट्यावर सध्या गर्दी च्या प्रमाणात दिवसेंदिवस होणारी वाढ .यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे होऊन बसले आहे . या फाट्यावरुन अवनखेड, व निळवंडी पाड्याकडे रस्ता असल्याने याठिकाणी चौफुली रस्ता तयार झाला आहे . याठिकाणी दिशादर्शक फलक आजही नाही . गतीरोधक होते तेही उखडले गेले आहे . त्यामुळे हे ठिकाण वाहनधारकांना लवकर कळत नसल्याने वारंवार अपघाताच्या प्रमाणात वाढ होत आहे .

मागील काही काळांपासुन वलखेड फाटा हा मुत्यूचे माहेरघर बनला असुन याठिकाणी आतापर्यंत आमच्या पाच शिक्षकांचा मुत्यू, व तीन शिक्षक अत्यंत गंभीर जखमी होऊन जीवन मरणांचा संघर्ष करीत आहेत . आमचे सहकारी विद्यार्थी घडवित असतात . परंतु शिक्षकांचा अपघातात मुत्यू होणे म्हणजे विद्यार्थी वर्गावर आपले शिक्षक अपघातात गतप्राण झाल्याने मोठ्या प्रमाणावर परिणाम होत असतो . तेव्हा सबंधित विभागाने या फाट्यावर वाहनगती नियंत्रित करण्यासाठी कायम स्वरूपी गतीरोधक, झेब्रा पट्टे, दिशादर्शक फलक, रेडियम पट्टे निर्माण करून द्यावेत .
**–संतोष कथार ( दिंडोरी विद्यालय शिक्षक )**

## महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा बुधवारी सिल्लोड-सोयगाव दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**अजिंठा :** राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील




यांचा रविवारी 23 रोजी होणारा दौऱ्यात काही अपरिहार्य कारणामुळे बदल झाल्याने तो दौरा आता बुधवारी ता.26 रोजी होणार असल्याची माहिती शिवसेना तालुकाप्रमुख देविदास पा.लोखंडे यांनी दिली आहे. सोयगांव येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचा भूमिपूजन सोहळा व सिल्लोड तालुक्यातील शिवना येथे आयोजित भव्य शेतकरी मेळावा असे कार्यक्रम होणार असून हे दोन्ही कार्यक्रम बुधवार ता.26 रोजी संपन्न होणार आहेत. यांत दुसरा कोणताही बदल नसल्याची दखल सिल्लोड-सोयगांव तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी बांधव, आणि नागरिकांनी घ्यावी व प्रत्येक गावांतील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपापल्या गावांत ही माहिती जनसामान्यांना द्यावी व दोन्ही कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे अवाहन देखील तालुकाप्रमुख लोखंडे यांनी जनतेला केले आहे.

# बी.कॉम. तृतीय वर्गाच्या 'ऑडिटिंग'चा पेपर 'आऊट ऑफ सिलॅबस'

## प्रश्नपत्रिका हाती पडताच विद्यार्थी गोंधळात; नांदेड विद्यापीठाचा अनागोंदी कारभार

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड/लातूर/परभणी/हिंगोली :** सध्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या उन्हाळी 2023 पदवीच्या परीक्षा सुरू आहेत. या परीक्षेत बी.कॉम. तृतीय वर्षाच्या सहाव्या सत्रातील ऑडिटिंग-II हा पेपरमधील 35 गुणांचे प्रश्न हे 'आऊट ऑफ सिलॅबस' पडल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. दरम्यान, प्रश्नपत्रिका हाती पडताच पहिला अनिवार्य असलेला 20 गुणांचा प्रश्न पाहून विद्यार्थी संभ्रमात पडले. आता विद्यार्थ्यांना या प्रश्नाचे गुण मिळावेत अशी त्यांची मागणी आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, सध्या नांदेड विद्यापीठाच्या पदवीच्या परीक्षा सुरू आहेत. 24 एप्रिल रोजी सकाळी 10 ते दुपारी 1 यावेळेत बी.कॉम. तृतीय वर्षाचा ऑडिटिंग-II या विषयाचा पेपर होता. प्रश्नपत्रिकेत पहिला प्रश्न 20 गुणांचा अनिवार्य असतो. या प्रश्नाला पर्यायी प्रश्न असत नाही. मात्र, हा 20 गुणांचा प्रश्न त्यात 'प्रोसेस ऑफ ऑडिटिंग' हा प्रश्न विचारण्यात आला होता. मात्र, अभ्यासक्रमात कुठेही प्रोसेस ऑफ ऑडिटिंग समाविष्ट नाही. तरीही हा प्रश्न विचारल्याने आणि याला पर्यायी प्रश्न नसल्याने विद्यार्थी संभ्रमात पडले. प्रश्नपत्रिका हाती पडताच विद्यार्थ्यांमध्ये चलबिचल सुरू झाली. विद्यार्थ्यांनी ही बाब पर्यवेक्षक आणि परीक्षा केंद्रावरील अधिकाऱ्यांना लक्षात आणून दिली मात्र त्याचा काही उपयोग झालेला नाही. कारण, परीक्षा केंद्राचे काम हे केवळ परीक्षा घ्यायचे आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्याचे काम प्राध्यापकांचे असून, विद्यापीठ त्या प्रश्नपत्रिका संबंधित परीक्षा केंद्रांना पुरवितात. याच प्रश्नपत्रिकेत तिसरा प्रश्न हा सीआयएस (कॉम्प्युटराईझड इन्फॉर्मेशन सिस्टीम) चे घटक आणि महत्त्व विचारण्यात आले आहे. घटक आणि महत्त्व कुठेही अभ्यासक्रमात समाविष्ट नाही. एका प्रश्नपत्रिकेत 75 पैकी 35 गुणांचे प्रश्न हे अभ्यासक्रमात नसलेल्या पोर्शनवर विचारण्यात आल्याने विद्यार्थी संभ्रमात आहेत. आम्हाला या दोन्ही प्रश्नांचे गुण देण्यात यावेत अशी मागणी विद्यार्थ्यांची आहे. आता यावर विद्यापीठ प्रशासन काय भूमिका घेईल, हे पाहावे लागेल.


This question paper contains 2 printed pages]

HA—54—2023

FACULTY OF COMMERCE

B.Com. (Third Year) (Sixth Semester) EXAMINATION

APRIL/MAY, 2023

(New Course)

AUDITING

Paper–BC-6.3


(Monday, 24-4-2023) Time : 10.00 a.m. to 1.00 p.m.

*Time— Three Hours* *Maximum Marks—75*

**एकाच 'चॅपटर' वर तब्बल 50 गुणांचे प्रश्न** : या प्रश्नपत्रिकेत 35 गुणांचे प्रश्न आऊट ऑफ सिलॅबस आहेत. पेपर तयार करणाऱ्या प्राध्यापकाचा हा प्रकार एवढ्यावरच थांबलेला दिसत नाही. अक्षरश: या प्रश्नपत्रिकेत पहिल्या एकाच युनिट (चॅपटर) वर एकूण 50 गुणांचे तब्बल चार प्रश्न विचारण्यात आले आहेत. सीबीसीएस अनुषंगाने प्रत्येक चॅपटर समान गुणांचे प्रश्न विचारणे आवश्यक असतानाही तसे न करता एकाच चॅपटरवर 50 गुणांचे प्रश्न का विचारले? हा प्रश्न आहे. आता यावर विद्यापीठ प्रशासन काय कारवाई करणार ते लवकरच कळेल.

# भोकर तालुक्यातील गावांत ग्रामजयंतीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या जयंतीच्या औचित्यांने अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ शाखा-कांडली ता.भोकर यांच्या वतीने दि.२५ एप्रिल २०२३ ते दि.२९ एप्रिल २०२३ पर्यंत तालुक्यातील विविध गावांमध्ये ग्राम जयंती साजरी करण्यात येणार आहे.

वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी आयुष्यभर ग्राम सुधारणेवर भर देऊन गाव स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनावे त्यासाठी भारतभर भ्रमंती करून भजन, कीर्तन, प्रवचन व तसेच ग्रामगीतेच्या माध्यमातून गावागावातील जनतेत जनजागृती केली. गाव हा विश्वाचा नकाशा | गावावरून देशाची परीक्षा | गावची भंगता येईल अवदशा | देशाशी || राष्ट्र मजबूत व स्वयंपूर्ण बनवायचे असेल तर अगोदर देशातील गावे स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनले पाहिजेत. गावातला प्रत्येक व्यक्ती उद्योगशील व निर्वेशनी बनला पाहिजे. ही शिकवण त्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या सानिध्यात राहून आत्मसात केली व जीवनभर ग्राम सुधारण्यासाठी मोलाचे कार्य संपूर्ण भारतभर श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून केले. माझी जयंती ही भारतभर ग्राम जयंती म्हणून साजरी झाली पाहिजे हे त्यांचे स्वप्न होते. त्यामुळेच त्यांची जयंती ही सर्वत्र ग्राम जयंती म्हणूनच साजरी केली जाते.

या ग्राम जयंतीच्या औचित्यांने भोकर तालुक्यात दि.२५ एप्रिल २०२३ रोजी मौजे रायखोड, दिनांक २६ एप्रिल रोजी मौजे लगळुद, दि.२७ एप्रिल रोजी मौजे कांडली, दिनांक २८ एप्रिल रोजी मौजे दिवशी बु. व दिनांक २९ एप्रिल २०२३ रोजी मोजे जामदरी अध्यात्म गुरुकुल टेकडी येथे सकाळी ९ ते ११ या वेळेत श्री भीमाशंकर महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने या ग्राम जयंतीचा समारोप करण्यात येणार आहे. ग्राम जयंतीच्या निमित्ताने प्रत्येक गावात सकाळी रामधून, ध्यान, प्रवचन, ग्रामसफाई आदी कार्यक्रम घेण्यात येणार असून सायंकाळी सामुदायिक प्रार्थना, प्रवचन, खंजेरी भजन व मान्यवर संतांची कीर्तने होणार आहेत. सर्व कार्यक्रमात हभप शिवदास शृंगारे महाराज गुरुकुंज आश्रम अमरावती, श्री चैतन्य बाबा कोंडदेव आश्रम कांडली, नर्मदा आई जामदरी, निर्मलाताई खडतकर, राजा खंडेराव देशमुख पळशीकर, गोपाळ महाराज मुरझळेकर, शेषराव पाटील लगळुदकर, उत्तमराव दिवशीकर, पीएसआय बालाजी गाजेवार, पीएसआय दत्ता काईतवाड, बापूराव पाटील सोनारीकर व श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सर्व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. तरी तालुक्यातील सर्व भक्त मंडळींनी या कार्यक्रमाचा आवर्जून लाभ घ्यावा असे आवाहन अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ शाखा कांडली तर्फे करण्यात आले आहे.

# पातोंडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**नांदुरा :** पातोंडा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 132 जयंती संघर्ष क्रीडा मंडळ च्या वतीने 20 एप्रिल रोजी भव्य मिरवणूक काढून उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पातोंडा सरपंच सौ रजनीताई सुभाष घुळे, उपसरपंच गयाबाई सिताराम नेमाडे, जिल्हा पुनर्वसन समिती सदस्य तथा माजी सरपंच पुरुषोत्तम झाल्टे, जळगाव जामोद येथील रणित सर यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी गावाच्या सर्व प्रमुख मार्गावर शोभेचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यामध्ये नारायण झाल्टे, यशवंत पाचपोर, रामदास सपकाळ, इतर गावातील मंडळी शोभा यात्रेत सहभागी झालेल्या सर्व समाज बांधवांना सहभागी झाले. सुभाषराव घुळे त्यांच्या वतीने पाण्याची व्यवस्था करण्यात आली तसेच नारायण झालटे यांच्यावतीने लिंबू सरबत देण्यात आली. यावेळी भव्य महाप्रसादाने सादर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. यावेळी सरपंच रजनी घुळे, गयाबाई नेमाडे, शुद्धोधन रणित, यशवंत पाचपोर, राहुल रणित, एकनाथ झाल्टे, पोलीस पाटील अशोक पाटील, भागवत नेमाडे, गजानन काळे रोशन झाल्टे, दत्ता गायगोळ, रामदास सपकाळ, कपिल सिरसाठ, देवानंद रणित, दिनकर रणित, सुनील रणित, संदीप रणित, मोहन रणित, भास्कर वाकोडे, मधुकर वाकोडे, प्रकाश वाकोडे, निवृत्ती रणित, किरण तेलंग, उमेश रणित, भीमराव रणित, ईश्वर रणित तसेच समता सैनिक दलाचे कार्यकर्ते यांच्यासह, सदस्य व बहुसंख्य समाज बांधव मोठ्या प्रमाणात उत्साहात सहभागी झाले होते पातोंडा नगरी दुमदुमून गेली होती, यावेळी एमपीसी दीपक सोळंके व इंगळे यांनी चोख बंदोबस्त ठेवल.

# रेल्वे आरक्षित तिकिटांचा काळाबाजार; तरुण जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** रेल्वेच्या आरक्षित तिकिटांचा काळा बाजार करणाऱ्यांवर रेल्वेच्या सुरक्षा बलाच्या पथकाने कारवाई करीत एकाला ताब्यात घेतले असून, तो ई-आरक्षण रेल्वे तिकिटांचा काळाबाजार करताना मिळून आला. त्याच्याकडून एकूण १७ हजार ३६७ रुपयांची नऊ तिकिटे जप्त करण्यात आली असून, त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नरेंद्र घोलप (वय ३४, रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्केट) असे ताब्यात घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. रेल्वे सुरक्षा बलाचे उपनिरीक्षक मनोज सोनी, मुख्य आरक्षण अधिकारी सुनील मराठे, विनोद जेठवे यांना जिल्हापेठ परिसरातील डॉ. आंबेडकर व्यापारी संकुलानजीकच्या लक्ष्मी निवास या निवासस्थानात संशयास्पद युझर आयडीवरून तिकिटांचा काळाबाजार सुरू असल्याची माहिती मिळाली होती.

# भारुडमहर्षी स्व. निरंजन भाकरे स्मृती सन्मान सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** रविवार, दि. 23 रोजी स्व. निरंजन भाकरे यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त रहिमाबाद येथे निरंजन भाकरे सांस्कृतिक लोककला व शिक्षण संस्था रहिमाबाद यांच्यावतीने भारुडकार शेखर निरंजन भाकरे यांनी भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन केले होते. त्यासोबतच दिग्गज शाहिरांचा शाहिरी बाणा हा कार्यक्रम सुद्धा आयोजित केला होता. सन्मान सोहळ्यामध्ये विविध क्षेत्रात यश मिळवलेल्या यशस्वीतांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये ऋषिकेश पंढरीनाथ गायकवाड याने RTSE स्पर्धा परीक्षेत इयत्ता 5 वी तून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून तिसरा नंबर तर सिल्लोड तालुक्यातील पहिला



नंबर पटकावला त्याबद्दल ऋषिकेश गायकवाड या विद्यार्थ्याचा सन्मान करण्यात आला. एमबीबीएसला प्रवेश मिळालेले विद्यार्थी राहुल संतोष पंडित, महेश बाबुराव काळे, माधवी अनिल गावंडे, महाराष्ट्र पोलीस मध्ये सिलेक्ट झालेले संतोष शिंदे, लहू चिंचपुरे, पुणे पोलीस मध्ये सिलेक्ट झालेले परमेश्वर अशोक मोरे, साईनाथ एकनाथ मोरे, अक्षय अण्णा लहाने तसेच महिला पोलीस मध्ये सिलेक्ट झालेल्या सख्या बहिणी प्रियंका हरिदास बोडखे, कोमल हरिदास बोडखे, त्याचबरोबर एकाच कुटुंबातील ननंद भावजय कु. योगिता विश्वनाथ शेळके, सोनू सोपान शेळके या सर्व यशस्वीतांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. हा सन्मान सोहळा आयोजित करून भारूडकार शेखर भाकरे यांनी समाजामध्ये एक आदर्श उभा केलाच परंतु यातून अनेकांना प्रेरणा मिळेल आणि पुन्हा पुन्हा असेच यशवंत व्यक्तिमत्व समाजात निर्माण होतील अशा स्वरूपाचा सन्मान सोहळा संपन्न झाला असे प्रतिपादन मा. प्राचार्य नामदेवराव चापे यांनी यावेळी बोलताना केले. या सन्मान सोहळ्याचे उद्घाटन मा. प्राचार्य नामदेवराव चापे, पीएसआय सागर क्षीरसागर यांच्या हस्ते झाले तर या प्रमुख पाहुणे म्हणून सचिन उपळीकर, अनिल कुलकर्णी, जितेंद्र पाडवे, ह.भ.प. अजबराव म. मिरगे, शुभम पालोदे, नामदेव पा. सिरसाट, पुंडलिक नाना चापे, सुभाष नवल, डॉ. सुनील खराडे, विलास चिंचपुरे, जयराम चिंचपुरे, शिवा महाराज वाघ व गावकरी तसेच परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# पराजयातूनच खेळाडूंची चांगली प्रगती होते : अभिजित कुंटे

## क्रीडा भारतीच्या जिजामाँ सन्मान पुरस्कारांचे शानदार वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** खेळाडूंना यशापेक्षाही पराभवाला जास्त वेळा सामोरे जावे लागते मात्र अशा पराजयातूनच शिकत खेळाडूंची प्रगती होते. अशा पराजयाच्या वेळी या खेळाडूंच्या मागे यांच्या आई वडील खंबीरपणे उभे राहतात त्यामुळे खेळाडूची चांगली प्रगती होते असे ग्रॅंड मास्टर अभिजीत कुंटे यांनी सांगितले. प्रत्येक खेळाडूच्या यशामागे त्याच्या आई-वडिलांचा विशेषतः आईचा मोठा वाटा असतो. हे लक्षात घेऊन क्रीडा भारती संस्थेतर्फे दरवर्षी आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय स्तरावर नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या खेळाडूंच्या मातांचा गौरव केला जातो. यंदा मेजर ध्यानचंद पुरस्कार विजेते ग्रॅंडमास्टर बुद्धिबळपटू अभिजीत कुंटे आणि आंतरराष्ट्रीय टेनिसपटू तसेच भारतीय महिला संघाच्या प्रशिक्षिका राधिका तुळपुळे कानिटकर यांच्या हस्ते हा समारंभ आयोजित करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या सुदृढ भारत उपक्रमाचे कौतुक करीत अभिजित कुंटे यांनी पुढे सांगितले," गेल्या पाच वर्षांमध्ये सुदृढ भारत उपक्रमामुळे आपल्या देशात खेळाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे देशातील क्रीडा संस्कृती वाढण्यास मदत होईल. राधिका कानिटकर यांनी क्रीडा भारतीच्या उपक्रमांचे कौतुक करीत सांगितले, सहसा खेळाडूंच्या पालकांचे कौतुक होत नाही. क्रीडा भारती तर्फे खेळाडूंच्या मातांचा सत्कार करण्याचा उपक्रम म्हणजे खऱ्या अर्थाने क्रीडा क्षेत्राचा गौरवच आहे. यंदा श्रीमती नेहा जोगळेकर (जिम्नॅस्ट रोमा जोगळेकरच्या मातोश्री), सुनंदा गाढवे (धावपटू स्वाती गाढवे), सोनी मानकर (जलतरणपटू स्वेजल मानकर), राखी राजा (बुद्धिबळपटू हर्षित राजा), आशा काळे (मल्लखांबपटू कृष्णा काळे), आशा बोरा (व्हॉलीबॉलपटू प्रियांका बोरा), शीतल तळेकर (जिम्नॅस्ट श्रद्धा तळेकर), कल्पना बाबर (जलतरणपटू हर्ष बाबर), भाग्यश्री नाईक (ट्रायथलॉनपटू तेजश्री नाईक), नमिता देव (स्केटिंगपटू स्वराली देव) या मातांबरोबरच आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टर नीता मेहता व स्केटिंगमध्ये विश्वविक्रम नोंदविणारी खेळाडू देशना नहार यांचाही गौरव करण्यात आला. तसेच क्रीडा भारती तर्फे यंदापासून सुरू करण्यात आलेला जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ क्रीडा संघटक आणि प्रशिक्षक सुभाषराव कुलकर्णी यांना देण्यात आला. या समारंभात क्रीडा भारती संस्थेचे अखिल भारतीय महामंत्री राज चौधरी यांनी जिजामाँ पुरस्कार सुरू करण्याची भूमिका




स्पष्ट केली. यावेळीक्रीडा भारती संस्थेचे अखिल भारतीय कोषाध्यक्ष मिलिंद डांगे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विजय पुरंदरे हेही उपस्थित होते. प्रा. शैलेश आपटे यांनी स्वागत केले तर भाऊसाहेब खुणे यांनी आभार मानले. अनुजा दाभाडे यांनी सूत्रसंचालन केले.

# दादासाहेब सोमण: शैक्षणिक आणि औद्योगिकदृष्ट्या सक्षमतेची स्वप्न पाहणारे स्वातंत्र्यसेनानी


आधुनिक केसरी

**खरंतर दादासाहेब सोमण यांना स्वातंत्र्य सेनानी म्हणून ओळखल्या जाते.आपली भारतमाता पारतंत्र्यातून मुक्त व्हावी यासाठी तुरुंगवास भोगणारे, इंग्रजांना सळो की पळो करण्यासाठी बॉम्ब बनविण्याचे आरोपाखाली अटक झालेली असतांना आणि विशेष म्हणजे अहिंसेचे पूजक असणाऱ्या महात्मा गांधींचा ज्यांच्यावर प्रभाव होता,जे असहकार आणि चले जावं आंदोलनात सक्रिय होते,ज्यांना विनोबा भावे यांचा देखील सहवास लाभला,ज्यांनी १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग नोंदवला,जे मेहकर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष होते आणि नंतर ज्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांवर नंतरची वाटचाल केली असे दादासाहेब सोमण यांचे कार्य स्वातंत्र्य लढ्यात महत्वाचे जरी असले,ते नाकारता येत नसतांना देखील " गोडवा " च्या निमित्ताने त्यांचे कार्य अभ्यासतांना मला दादासाहेब भावले ते त्यांच्या शैक्षणिक आणि औद्योगिकधोरणामुळे.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र. : 9422880080

मेहकर या परिसराला औद्योगिक दृष्ट्या आणि शैक्षणिक दृष्ट्या पुढे नेण्याचे स्वप्न बघणारे दादासाहेब सोमण मला त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील भूमिकेपेक्षा महत्वाचे वाटतात,तसे वाटण्याची अनेक कारणे सुद्धा आहेत. दादासाहेब सोमण यांच्या संदर्भातील दस्तावेज अभ्यासतांना माझ्यासारख्या चौकस वृत्तीच्या माणसाच्या मनात अनेक प्रश्न उभे राहत असल्याने मला स्वातंत्र्यसेनानी दादासाहेब सोमण यांच्यापेक्षा उद्योजक दादासाहेब,शैक्षणिक संस्था उभी करणारे दादासाहेब त्याहीपेक्षा मोठे वाटतात. दादासाहेब सोमण यांची जन्मभूमी कोकण आणि कर्मभूमी विदर्भ अर्थात मेहकर. सोमण कुटुंब मूळचे कोकणातील. वडद ता. गुहागर जिल्हा रत्नागिरी येथील मूळचे रहिवासी असलेले हे कुटुंब.व्यंकटेश केशव सोमण मूळ नाव असणारे नंतर दादासाहेब सोमण या नावाने ओळखल्या जाऊ लागले. दादासाहेब यांचे वडील केशव सोमण हे वकिलीच्या निमित्ताने 11 वर्ष वय असलेल्या व्यंकटेश ( दादासाहेब ) यांचेसह आपल्या परिवाराला मेहकर येथे घेऊन आले आणि अशा पद्धतीने कोकणातील सोमण परिवार मेहकर चा कायम रहिवासी झाला. मी मेहकर एज्युकेशन सोसायटीचा विद्यार्थी.माझं पदवी च शिक्षण याच संस्थेत झाले.संस्थापक अध्यक्ष असलेल्या दादासाहेब सोमण यांचे नाव त्यावेळी नेहमी कानावर पडायचे. तेव्हापासून ह्या व्यक्तिमत्वाविषयी जाणून घेण्याची उत्सुकता होतीच. दादासाहेब सोमण यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील कार्याचा अभ्यास केला असता दादासाहेब सोमण यांची भूमिका काळानुरूप बदलत गेली.त्यांचा वैचारिक भूमिकेचा पाया बदलता राहीला असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. अहिंसा परमो धर्म मानणाऱ्या आणि त्याच विचारांवर वाटचाल करणाऱ्या महात्मा गांधी यांच्याच विचाराने दादासाहेब नावाचा तरुण प्रभावित झाला होता. या विचारांचा प्रभाव असलेल्या या तरुणाने त्याकाळी खादी च्या माध्यमातून मेहकर परिसरातील लोकांना स्वातंत्र्य चळवळीशी जोडले होते. बुद्धिमान,उत्कृष्ट वक्ता असलेल्या दादासाहेबांनी जर १९३० ला सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेतला, ते तालुका काँग्रेसचे अध्यक्ष होते तर त्या पूर्वी १९२० मध्ये त्यांना बॉम्ब बनविण्याच्या आरोपाखाली अटक झाली.तेच दादासाहेब १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभागी होतात.तेच दादासाहेब राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक डॉ हेडगेवार यांच्या नेतृत्वातील जंगल आंदोलनात सहभागी होऊन त्यांच्या समवेत तुरुंगात असतात असे त्यांच्याच परिवारातील सदस्यांनी लिहिलेल्या पुस्तकात म्हटले आहे. मेहकर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष असलेले व्यंकटेश ( दादासाहेब ) सोमण नंतर नगरसंघचालक



ही असतात.तेच दादासाहेब नंतर १९४२ ला देखील महात्मा गांधी यांच्या विचाराने प्रभावित होऊन मेहकर परिसरात चले जावं चळवळीत भाग घेऊन इंग्रजाच्या जुलमी राजवटी विरुद्ध एल्गार पुकारतात. दादासाहेब सोमण यांची विचारसरणी नेमकी कोणती याचा मुद्देसूद उलगडा कुठेच होत नाही.त्यांचे त्या काळात राजकीय,सामाजिक योगदान असेलही,परंतु त्यांच्या वैचारिक बैठकीस स्थिरता जाणवत नाही. केसरी च्या माध्यमातून लोकमान्य टिळकांशी देखील त्यांचा थेट संबंध.टिळक युग संपल्यानंतर पुन्हा त्यांची निष्ठा बदलताना दिसते. सामाजिक चळवळीत मोठे योगदान लाभलेल्या पंढरीनाथ पाटील यांच्या समवेत देखील दादासाहेब सोमण यांनी काम केलेले. १९३७ मध्ये कायदे मंडळाच्या निवडणुका संपन्न झाल्या. बुलडाणा जिल्ह्यात चिखली,मेहकर मतदारसंघातून व्यंकटराव केशवराव सोमण उपाख्य दादासाहेब सोमण यांनी ब्राम्हणेतर पक्षाचे उमेदवार पंढरीनाथ पाटील यांच्या विरुद्ध निवडणूक लढविली.त्या निवडणुकीत दादासाहेब सोमण यांचा पंढरीनाथ पाटील यांनी २२०० मतांनी पराभव केला. दादासाहेब सोमण यांचे व्यक्तिमत्व रेखाटतांना त्यांच्या बदलत्या भूमिकेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मात्र असे जरी असले तरीही दादासाहेब सोमण यांनी या भागाला औद्योगिकदृष्ट्या समोर नेण्याचे केलेले काम निश्चितच अभिमानास्पद आहे.त्याकाळात अनेकांना रोजगार मिळावा,हा परिसर औद्योगिक दृष्ट्या,आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा हा हेतू ठेवून साबण निर्मितीचा कारखाना त्यांनी उभा केला.सोमण जिनिंग उभी केली आणि व्यवसायाचे,उद्योगाचे जाळे निर्माण केले. दादासाहेब सोमण यांच्या ह्या कार्याला सर्वांचीच साथ मिळाली असती,त्यांची औद्योगिक नजर जर सर्वांना कळली असती तर केवळ मेहकर परिसर नव्हे तर विदर्भ हा पश्चिम महाराष्ट्राच्या देखील पुढे गेला असता. दादासाहेब सोमण यांनी एम ई एस ( मेहकर एज्युकेशन सोसायटी ) काढली. या संस्थेने अनेक विद्यार्थ्यांना घडविले. अमरावती बोर्डात एकाच वेळी अनेकजण मेरिट मध्ये आलेले याच संस्थेचे. याच संस्थेने माझ्यातील सुप्त गुणांना विकसित केले. याच संस्थेत शिकत असतांना वादविवाद स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून पहिला येण्याचा बहुमान मला मिळाला. दादासाहेब यांच्यानंतर या संस्थेचे अध्यक्षस्थानी प्रख्यात कवी,ज्यांची शीळ ही कविता घराघरात आणि लोकांच्या मनामनात पोहचली असे ना.घ.देशपांडे हे होते.आम्ही शिकत असतांना एम ई एस संस्थेची इमारत साधी होती,त्यावेळी मी लिहलेल्या माझ्याच कवितेतील ओळी मला आठवतात.

**नाही मोठी इमारत,नसे दुसरा मजला**
**संस्काराचा महिमा,आम्हा येथेच गावला**
**सुखी भविष्याची वाट,कॉलेज आम्हा दावी**
**अध्यक्ष लाभले आम्हा,एक नामवंत कवी**

## सुशिल गायकवाड यांचा पुस्तकदिनी अनोखा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**सातारा :** पुस्तके समाजातील प्रत्येक घटकाकडे गेली पाहिजे. आपल्या कामांमुळे आपल्याला पुस्तकाकडे लक्ष देता येत नाही.परंतु आपल्या कामा व्यतिरिक्त सुद्धा आपला वेळ हा पुस्तक वाचनात थोडा का होईना जाणे आवश्यक आहे. अवांतर वाचन करण्यापासून आपण कोसो दूर गेलेलो असून हल्ली पुस्तके वाटप करणे हे गरजेचे बनलेले आहे. हीच जाणीव ठेवून तरडगाव, ता. फलटण येथील सुशिल गायकवाड यांनी जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून पुस्तक वाटप केलेले आहे. पुस्तक वाटपातून पुस्तक दिन संपन्न करत असताना महात्मा फुले चौकातील व्यवसायिक गुलशन भाटिया, नितीन गोवेकर, सीमा गवळी, निलम गायकवाड,राकेश भाटिया, संजना मलके आदी उपस्थित होते. जनतेला संविधानाची भाषा समजावी. त्यांना सुद्धा संविधानाचे ज्ञान अवगत झाले पाहिजे. हेच ध्येय बाळगून सुशिल गायकवाड यांच्या कडून संविधान जागृती करण्याचा प्रयत्न केला जात आहे.आपली लोकशाही,आपले संविधान हे लोकांमध्ये घेऊन जाण्यासाठी त्यांनी लोकशाहीचा जागर नावाचे पुस्तक भेट दिलेले आहे. हे पुस्तक पुणे ( कोंढवा ) येथील संविधान अभ्यासक असलम इसाक बागवान यांचे असून पुस्तकातील शब्दांकन करण्याचे काम प्रा.मोनेश सुपेकर यांनी केलेले आहे.लोकशाहीचा जागर या पुस्तकातून आपला उमेदवार कसा असला पाहिजे, मतदारांनी मताचा वापर कसा केला पाहिजे, मतदारराजे हो, मतदानाला चला,

राज्यघटनेचे स्वरूप यासारख्या अनेक विषयांवर या पुस्तकातून विचार मंथन करण्यात आलेले आहे.

## संभाजी ब्रिगेडचे विधळे अपघातात ठार

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** सामान्यांच्या प्रश्नावर अत्यंत आक्रमक राहणारे संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक मंगेश विधळे ( ५१ ) यांचा आज सकाळी नऊ वाजता झालेल्या अपघातात मृत्यू झाला. विधळे आज अमरावतीवरून आपल्या दुचाकीने त्यांच्या सोनोरा ढोक या गावी येण्यास निघाले होते. गावालगत असतानाच त्यांच्या गाडीला बोलेरो या मालवाहू गाडीची धडक बसली. हेल्मेट तुटून पडले. त्याच अवस्थेत त्यांना पुलगाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांची प्राणज्योत मालवली. मराठा सेवा संघाचा उजवा हात म्हणून त्यांची ओळख होती. संघटना घराघरात पोहोचविण्यासाठी त्यांनी कष्ट घेतले, अशी माहिती संघटनेचे सुधीर गिरहे यांनी दिली.



## कन्नडमध्ये शिवशाही शेतकरी विकास पॅनलचा जोरदार प्रचार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकी रणधुमाळी सुरु कन्नडमध्ये शिवशाही शेतकरी विकास पॅनल माजी आमदार नितिन पाटील, माजी जिल्हा परीषद सदस्या संजना जाधव, शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख भरतसिंग राजपुत यांच्या मार्गदर्शना खाली पॅनल उभारण्यात आले असुन तालुक्यात जोरदार प्रचार सुरू आहे नितिन पाटील जिल्हा बॅंकेचे चेरमण असुन तालुक्यात वि .वि.का.स सोसायट्या ताब्यात आहे तसेच संजना जाधव यांच्याकडे गतवर्षी कृषी उत्पन बाजार समिती त्यांच्या ताब्यात असल्या कारणाने त्यांचाही दबदबा कायम दिसुन येत आहे तसेच शिंदे गटाचे वर्चस्व दाखवण्यासाठी जिल्हा प्रमुख भरतसिंग राजपुत तालुका प्रमुख केतन काजे यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे तालुक्यात नितिन पाटील यांचे बाजी मारणार औराळा पिशोर गटात जोरदार चर्चा सुरू आहे. यावेळी माजी आमदार नितीन पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संजना जाधव, जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत तालुकाप्रमुख केतन काजे, गोकुळसिंग राजपूत डॉ. मनोज राठोड, कैलास अकोलकर, साईनाथ अल्लाड इत्यादीची उपस्थीती होती.



# सोयगाव येथे सोयाबीन बियाणे उगवणक्षमता चाचणी प्रात्यक्षिक

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** येथे दि.24/4/2024 सोयगाव येथे कृषी विभागामार्फत सोयाबीन उगवणक्षमता चाचणीचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. यावेळी कृषी सहायक एम. आर. पाटील यांचेकडून शेतकऱ्याना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सोयाबीन हे स्वयंपराग सिंचित पिक असल्याने दरवर्षी नवीन बियाणे विकत घेऊन पेरणी करण्याची आवश्यकता नाही. दरवषी फक्त ३३ टक्के बियाण्याची बदल करावे असे विद्यापिठाने शिफारस केलेली आहे. ६७ टक्के बियाणे पुढील हंगामाकरीता राखुन ठेवण्याकरीता शेतक-यांनी त्यांना लागणारे बियाण्यासाठी चांगल्या जमीनीवर विशेष लक्ष देऊन दहा वर्षातील आतील जातीच्या वाणाची पेरणी करावी. या प्रक्षेत्रावरुन पुढील हंगामाकरीता बियाणे म्हणुन वापरावयाचे असल्याने पिकाची योग्य काळजी घेऊन स्वतंत्र कापणी व मळणी करावी. उत्पादीत बियाण्याचे योग्य प्रकारे प्रतवारी करुन सावली खाली ज्या ठीकाणी ओलाव्याचा संपर्क येणार नाही अशा ठीकाणी म्हणजे लाकडी फळयावर एका पोत्यात जास्तीत जास्त ४० कीलो बियाणे असे एकुण ४ ते ५ थप्पीमध्ये साठवुन ठेऊन पेरणीपूर्वी उगवण क्षमता तपासून पेरणी करणे अपेक्षीत आहे. परंतु शेतकरी धान्य म्हणुन साठवुन ठेवलेल्या सोयाबीनचा वापर पेरणी करिता करत असल्याने उत्पादनात घट येते. उगवण क्षमता चाचणीत 70टक्के किवा त्यापेक्षा जास्त उगवण क्षमता आलेल्या सोयाबीनचाच बियाणे म्हणून वापर करावा. तसेच पेरणी पूर्वी बियाण्यास थायरम व रायझोबियमची बीज प्रक्रिया करावी असे आव्हान शेतकऱ्यांना करण्यात आले. तसेच शेतकऱ्यांनी आपल्या कडे राखून ठेवलेल्या घरच्या बियाण्यांचाच जास्तीत जास्त वापर करावा असेही आव्हान यावेळी कृषी विभागामार्फत करण्यात आले.

# प्रत्येक मनाने भीम जयंती साजरी करावी : परघरमोल



आधुनिक केसरी न्यूज

**तेल्हारा :** भारतातील मातीच्या कणा-कणाने व समाजघटकातील प्रत्येक मना-मनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करावी असे प्रतिपादन भिमराव परघरमोल यांनी २३ एप्रिल रोजी बार्शीटाकळी तालुक्यातील येथील मोरगा काकड येथे केले.

सविस्तर वृत्त असे की, मोरगाव ( काकड ) ता. बार्शीटाकळी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३२ वी जयंती साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने भिमराव परघरमोल यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. तेव्हा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोपाल पाटील काकड ( सरपंच ) संजय पाटील काकड ( हभप ) सुनील अवचार ( संपादक राज्योन्नती अकोला ) शंकरराव आढाऊ ( गुरुदेव सेवामंडळ ) सिद्धार्थ बोदडे, गोपाल खोपाले, गजानन इंगोले यांची उपस्थिती होती. भिमराव परघरमोल आपल्या व्याख्यानात पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती भारत देशातील मतदारांनी, महिलांनी, शेतकऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी, एससी, एसटी, ओबीसी, एनटी, डीएनटी, एसबीसी, मायनॉरिटीजसह देशातील प्राण्यांनी, जंगल व डोंगरदऱ्यांनी साजरी करावी कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या सर्वांना संविधानिक हक्क अधिकार व संरक्षण मिळवून दिले आहे. असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोवर्धन पाटील काकड यांनी केले तर आभार संजय पाटील काकडे यांनी मानले कार्यक्रमासाठी सावित्रीबाई फुले उपासिका व उपासक संघ तसेच समस्त गावकरी मंडळी यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील सर्व जाती-धर्माच्या महिला-पुरुषांची उपस्थिती होती.

# उधारी मागितली म्हणून दुकानदारास बेदम मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरातील मुख्य चौकात राघवेंद्र प्रोविजन स्टोअर्स या नावाने किराणा दुकान असून दुकानचे मालक गजानन भीमाशंकर वट्टमवार यांनी दोन-तीन वर्षापासून थकीत असलेली उधारी मागितली याचा राग मनात धरून दुकानात घुसून मारहाण केल्याचा प्रकार जिंतूर शहरात काल घडला याप्रकरणी जिंतूर पोलिसात आयुब मेहराज अली व हसन अली या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की वरील दुकानदाराच्या घराच्या मागच्या बाजूला राहणारा आरोपी आयुब अली याने आपल्याला उधारीत का मागितली हा राग मनात धरून आपल्या भाच्याला बोलून राघवेंद्र किराणा दुकानात घुसून गजानन वट्टमवार यास मारहाण केली सदर घटना सीसीटिव्ही मध्ये रेकॉर्ड झाली घटना घडल्यानंतर शेजारी यांनी सोडवले यानंतर जिंतूर पोलिसात जिंतूर शहरातील अनेक व्यापारी मोठ्या संख्येने जमा झाले परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक कुंदन कुमार वाघमारे यांनी तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले वरील आरोपी यांचे विरुद्ध गजानन वट्टमवार यांचे फिर्यादीवरून जिंतूर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे भारतीय दंड विधान कलम 452, 323, 324, 504,506,34 भादविनुसार गुन्हा दाखल झाला आहे परंतु अद्यापही आरोपीला अटक नसल्याने कडक कार्यवाही करावी अशी मागणी व्यापारी करत आहेत.

# उपजिल्हा रुग्णालयात हिवताप दिनानिमित रुग्णांचे प्रबोधन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील उपजिल्हा रुग्णालयात जागतिक हिवताप दिन निमित मंगळवार( ता.२५ )रोजी जिल्हा आरोग्य समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितित रुग्णांना या आजारची माहिती देण्यात आली. जिल्हा हिवताप अधिकारी रविंद्र ढोले,व वैजापूर उपजिल्हा रूग्णालय अधिक्षक डॉ. गजानन टारपे यांच्या मार्गदर्शन खाली राजपूत यांनी रुग्णांना तीव्रताप असल्यास, रक्ताच्या उलट्या होत असल्यास व डोळे दुखत असल्यास तपासणी व उपचार घेण्याचा सल्ला दिला. माठ, हौद, झाकुन ठेवा, गप्पी मासे पाण्यात सोडा, आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळा असे आवाहन केले. याप्रसंगी, वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश आंधळकर, डॉ.सचिन चव्हान, विजय पाटील, श्याम उचित, मंगेश मापारी, रामेश्वर नारले, राम सोनूने,नर्स श्रीमती कूळसकर, गावीत सिस्टर, शीतल तळेकर, मयुर त्रिभुवन, संजय शिराळे, अरुण पाटील, विजय मगरे व रूग्ण उपस्थित होते.






गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर